


# दैनिक चालु वार्ता




✻ पुणे ✻ वर्ष : ४ ✻ मुख्य संपादक : डि.एस.लोखंडे पाटील ✻ अंक : ३५० ✻ बुधवार दि.१६ जुलै २०२५ ✻ पाने : ०४ ✻ किंमत रु.३ ✻ RNI No.: MAHMAR/2021/82895

✻ Chief Editor : D.S.Lokhande Patil ✻ Pune ✻ Vol 4 ✻ Issue 350 ✻ Wednesday ✻ 16 July 2025 ✻ Pages 04 ✻ Price Rs.3 ✻ RNI No.: MAHMAR/2021/82895 ✻ E-mail : dainikchaluwartha@gmail.com

✻ पुणे ✻ नांदेड ✻ छ.संभाजीनगर ✻ बीड ✻ परभणी ✻ हिंगोली ✻ जालना ✻ लातूर ✻ धाराशिव ✻ मुंबई ✻ पालघर ✻ ठाणे ✻ रायगड ✻ रत्नागिरी ✻ अहमदनगर ✻ सोलापूर ✻ सातारा ✻ अमरावती ✻ यवतमाळ ✻ वर्धा ✻ वाशिम ✻ चंद्रपूर ✻

# अल्पसंख्याक अन एससी-एसटींविरुद्ध भेदभाव केल्यास होणार तुरुंगवास...

**दै.चालु वार्ता वृत्तसेवा**

**मुंबई :** कर्नाटक सरकार अल्पसंख्याक आणि एससी एसटी यांच्या संरक्षणासाठी नवीन विधेयक आणण्याची तयारी करत आहे. सरकार २०१६ मध्ये आत्महत्या केलेल्या दलित पीएचडी विद्यार्थ्याच्या नावाने एक विधेयक मांडणार आहे.

हे विधेयक विधानसभेच्या पावसाळी अधिवेशनात मांडले जाऊ शकते. भेदभावात दोषींना कठोर शिक्षेची तरतूद यात असल्याचे वृत्त आहे. या विधेयकाबाबत राज्य सरकारकडून कोणतीही प्रतिक्रिया दिलेली नाही. कर्नाटक रोहित वेमुला (बहिष्कार किंवा अन्याय प्रतिबंधक) (शिक्षण आणि प्रतिष्ठेचा अधिकार) विधेयक, २०२५ हे पावसाळी अधिवेशनात मांडले जाऊ शकते. त्यात अनुसूचित जाती (SC), अनुसूचित जमाती (ST), इतर मागासवर्ग (OBC) आणि अल्पसंख्याकांचा समावेश असेल.

**तरतुदी काय आहेत?**

या विधेयकाचे उद्दिष्ट अनुसूचित जाती, जमाती, इतर मागासवर्गीय आणि अल्पसंख्याकांना खाजगी आणि सरकारी विद्यापीठांमध्ये शिक्षणाचा अधिकार आणि प्रवेश देणे हा आहे. 'या अंतर्गत गुन्हा सिद्ध झाल्यास जामीन मंजूर केला जाणार नाही. तसेच, जर कोणी भेदभाव केला किंवा भेदभावाला पाठिंबा दिला किंवा भडकावला तर त्याला शिक्षा होईल', असं या विधेयकाच्या मसुद्यात असल्याचे स्थानिक वृत्तपत्रांनी म्हटले आहे.




काँग्रेसच्या 'रोहित वेमुला' विधेयकात काय ?

पहिल्यांदाच गुन्हा केल्यास एक वर्षाचा तुरुंगवास आणि १० हजार रुपये दंडाची तरतूद आहे. तसेच, न्यायालय पीडितेला थेट नुकसानभरपाई देण्याची परवानगी देऊ शकते. ही रक्कम १ लाखांपर्यंत जाऊ शकते. गुन्हा पुन्हा केल्यास तीन वर्षांचा तुरुंगवास आणि १ लाख रुपये दंडाची तरतूद आहे.

**संस्थेवरही होणार कारवाई**

जर कोणतीही संस्था सर्व वर्ग, जाती, पंथ, लिंग किंवा राष्ट्रांना शिक्षण देण्याच्या तरतुदींचे उल्लंघन करत असेल तर त्यावर समान शिक्षा लागू केली जाईल. अहवालानुसार, अशा संस्थांना राज्य सरकारकडून आर्थिक मदत किंवा अनुदान दिले जाणार नाही असे विधेयकात म्हटले आहे.

हैदराबाद विद्यापीठाचा विद्यार्थी रोहित वेमुला याने जानेवारी २०१६ मध्ये कथित जातीभेदामुळे आत्महत्या केली होती. खासदार राहुल गांधी यांनी कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या, हिमाचल प्रदेशचे मुख्यमंत्री सुखविंदर सिंह आणि तेलंगणाचे मुख्यमंत्री रेवंत रेड्डी यांना पत्र लिहून 'रोहित वेमुला कायदा' लागू करण्याची मागणी केली होती. आता काँग्रेस सरकार हे विधेयक आणण्याची तयारी करत आहे.

# भारत-रशिया-चीन त्रिकुट ...

## पुतिन यांचे स्वप्न अमेरिका अन डोनाल्ड ट्रम्प यांची झोप उडवणार !

**दै.चालु वार्ता वृत्तसेवा**

**मुंबई :** जवळजवळ संपूर्ण जगावर महासत्ता अमेरिकेचा दबाव पाहायला मिळतो. पण, आता जागतिक राजकारणाला एक नवीन वळण लागणार आहे. रशिया, भारत आणि चीन हे त्रिकूट एक जवळ येत आहे. रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांचे स्वप्न आहे की, या त्रिकुटाच्या जोरावर बलाढ्य अमेरिका आणि डोनाल्ड ट्रम्प सारख्या नेत्यांना नमवता येईल. पण, हे त्रिकुट एकत्र येणे सोपी बाब नाही. यासाठी बरीच मेहनत घ्यावी लागणार आहे.

**पुतिन यांचे स्वप्न**

पुतिन यांचे स्वप्न अशा जगाचे आहे, जिथे अमेरिकेचे वर्चस्व संपलेले असेल, ज्यामुळे इतर देशांची शक्ती संतुलित राहील. रशिया, भारत आणि चीन एकत्रितपणे अमेरिकन प्रभाव कमकुवत करणारी युती तयार करू शकतात, असे त्यांना वाटते. या त्रिकूटाचे उद्दिष्ट नवीन आर्थिक आणि लष्करी भागीदारीद्वारे जागतिक शक्तीचे पुनर्वितरण करणे आहे. भारत आणि चीनच्या वाढत्या अर्थव्यवस्था आणि रशियाचा लष्करी अनुभव या युतीला



मजबूत बनवतो.

**भारत:** भारत त्याच्या स्वतंत्र परराष्ट्र धोरण आणि आर्थिक विकासासह युती संतुलित करतो.

**चीन:** चीन त्याच्या तांत्रिक आणि आर्थिक शक्तीने जागतिक प्रभाव वाढवत आहे.

**रशिया:** रशिया त्याच्या ऊर्जा संसाधने आणि लष्करी तंत्रज्ञानाद्वारे या त्रिकूटाला बळकटी देत आहे.

**अमेरिकेची चिंता आणि हस्तक्षेप**

अमेरिका या त्रिकुटाला त्यांच्या वर्चस्ववादी धोरणांसाठी धोका मानते. प्रतिसादात, अमेरिकन हस्तक्षेप धोरणे तीव्र झाली आहेत...

**युक्रेनला मदत:** रशियाला गुंतवण्यासाठी अमेरिका युक्रेनला शस्त्रे पाठवत आहे, जेणेकरून रशियाचे लक्ष विचलित होईल आणि ते भारत-चीनशी असलेल्या युतीवर लक्ष केंद्रित करू शकणार नाही.

**ऑस्ट्रेलिया आणि जपानवर दबाव:** आशिया-पॅसिफिक प्रदेशात अमेरिकन प्रभाव कायम राहावा, म्हणून पेंटागॉन ऑस्ट्रेलिया आणि जपानला चीनविरुद्ध उभे करण्याचा प्रयत्न करीत आहे.

**भारतावरील दबाव:** अमेरिका भारताला स्वस्त रशियन तेल खरेदी करण्यापासून रोखण्याचा प्रयत्न करीत आहे. तसेच, ते NATO+ मध्ये सामील करुन चीनविरुद्ध भारताचा वापर करू इच्छित आहे, परंतु भारताला शांतता हवी आहे.

**रशियाच्या अर्थव्यवस्थेवर फटका:** अमेरिकेने रशियावर कठोर निर्बंध लादले, परंतु त्याचा उलट परिणाम झाला. भारत आणि चीनने रशियाकडून तेल खरेदी वाढवली. यामुळे रशियाची अर्थव्यवस्था मजबूत होत आहे.

**डॉलरची भीती:** अमेरिकेला भीती आहे की, चीनची वाढती शक्ती आणि ब्रिक्स देश डॉलरपासून दूर जाण्याच्या कल्पनेमुळे त्यांच्या चलनाची जागतिक स्थिती कमकुवत होऊ शकते. ट्रम्पने त्याविरुद्ध शुल्क लादण्याची धमकी देत आहेत.

**अमेरिकन सिनेटरचा इशारा**

लिंडसे ग्रॅहम सारख्या अमेरिकन सिनेटरने भारत आणि चीनला रशियाला सहकार्य केल्यास परिणाम भोगावे लागतील, असा इशारा दिला आहे. तर, रशियाने ग्रॅहमला दहशतवादी आणि अतिरेकी घोषित केले आहे. यावरून असे दिसून येते की, या देशांनी स्वतःचे नाही, तर त्यांचे हित प्रथम ठेवावे, अशी अमेरिकेची इच्छा आहे. परंतु भारत आणि चीनने पाश्चात्य 'फोडा आणि राज्य करा' धोरणला लात मारली आहे.

**भारत-चीन सहकार्य**

भारत आणि चीनने सीमा वाद

(पान ३ वर...☛)

# ब्राह्मण मुख्यमंत्री आणि स्वत: मंत्री असतानाही गडकरी असे का म्हणाले...

**दै.चालु वार्ता वृत्तसेवा**

**मुंबई :** केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी आपल्या अनेक भाषणांमधून जात, धर्म, पंथ यांना महत्त्व देत नाही असे सांगितले आहे. तसेच जातीची गोष्ट करणाऱ्यांना गडकरी जुमानत नाहीत हे सर्वश्रुत आहे. असे असतानाही त्यांनी नागपुरमधील एका कार्यक्रमात पुन्हा एकदा स्वत:च्या जातीबद्दल उघडपणे वक्तव्य केले आहे. यावेळी त्यांनी ब्राह्मण जातीचे काय दु:ख आहे याची माहिती दिली.

सध्या देशात भाषण वरून वाद सुरू आहे. महाराष्ट्रात हिंदी भाषा सुरू करण्यावरून अलीकडेच वाद निर्माण झाला होता. शेवटी राज्य सरकारला माघार घ्यावी लागली. तर गृहमंत्री अमित शहा यांनी इंग्रजी भाषा शिकणाऱ्यांना लाज वाटेल असे विधान केले होते. मात्र नेहमीप्रमाणेच नितीन गडकरी यांनी स्पष्ट विधान केले आहे.

ते काल या कार्यक्रमात म्हणाले की, शिक्षण ही आपली शक्ती आहे. शिक्षण घेतल्याशिवाय कुठल्या समाजाचा विकास होऊ शकत नाही. आज अनेक लोक ट्रक ड्रायव्हर, चहाचे दुकान अशी छोटी कामे करताना दिसतात. त्यांच्यामध्ये चांगली कला



## महाराष्ट्राच्या राजकारणात ब्राह्मणांना किंमत नाही !

कौशल्य असूनही केवळ शिक्षणा अभावी ते मागे पडलेले आहेत. त्यामुळे सगळ्या भाषांचे शिक्षण चांगले शिक्षण घ्यावे असं आव्हान त्यांनी केले. शिक्षण घेत असताना पदवी अभ्यासक्रमात तुम्हाला खूप गुण मिळाले म्हणजे तुम्ही यशस्वी झाला तसे नाही. मी विधी अभ्यासक्रमात असताना मागच्या बाकावर बसणारे आज मोठे वकील झाले तर गुणवत्ता यादीत आले नाही असेही गडकरी म्हणाले.


**ब्राह्मण जातीसंदर्भात नेमके काय म्हणाले गडकरी**

गडकरी म्हणाले की, मी स्वत: ब्राह्मण असूनही महाराष्ट्रात आमच्या जातीला फार महत्त्व नाही. इकडे आमची फार चालत नाही. मात्र, उत्तर भारतात ब्राह्मणांना फार महत्त्व आहे. तिकडे दुबे, चतुर्वेदी यांची चलती असते. राजकारणामध्ये त्यांचे प्राबल्य आहे. एकदा उत्तर प्रदेशातील एका कार्यक्रमाला गेले असता व्यासपीठाने एकाने सांगितले की, अटल बिहारी यांच्यानंतर आमच्या समाजाती एका नेत्याच्या आम्हाला गर्व आहे. आज गडकरींना संपूर्ण देश ओळखतो, असेही ते म्हणाले. यावर गडकरींनी त्यांना खडसावून सांगितले. मी कुठल्याही जाती, धर्माला मानत नाही. त्यामुळे मी केवळ तुमचा नसून सर्व समाजाचा आहे.

# अजित पवार यांना धक्का

**दै.चालु वार्ता वृत्तसेवा**

**देवळा (नाशिक) :** येथील वसंतदादा साखर कारखान्याचा केंद्र सरकारच्या राष्ट्रीय सहकार विकास परिषदेने लिलाव जाहीर केला आहे. या कारखान्यावर विविध बँकांचे तसेच राज्य सहकारी बँकेचे १२४ कोटींचे कर्ज थकीत आहे. त्यामुळे २८ हजार सभासदांचा हा कारखाना वाचविण्यासाठी आता उपमुख्यमंत्री अजित पवार काय भूमिका घेतात, याची उत्सुकता आहे. केंद्रीय सहकार मंत्रालयाच्या अर्थात सहकार मंत्री अमित शहा



## वसंतदादा कारखाना लिलावात !

यांच्या नियंत्रणाखालील NCDC संस्थेने कारखान्याच्या लिलावाची किमान बोली ६२ कोटी जाहीर केली आहे. या कारखान्याला भाडेतत्वावर द्यावे यासाठी कामगार व सभासद पाठपुरावा करीत होते. मात्र त्याला केंद्रीय संस्थेने दाद दिली नाही. त्यामुळे सभासदांत संतापाचे वातावरण आहे.

भाजपचे आमदार डॉ. राहूल आहेर यांच्या मतदारसंघातील हा कारखाना आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील राज्य सहकारी बँकेने या कारखान्याला डिस्टीलरी काढण्यासाठी कर्ज दिले. त्यांचे १२४ कोटींचे कर्ज थकीत आहे. असे असताना लिलावाची किमान बोली ६२ कोटी असल्याने तो चर्चेचा विषय आहे.

पाच तालुक्यांचे कार्यक्षेत्र असलेल्या या कारखान्याच्या लिलावाची प्रक्रिया सुरू झाली आहे. थकीत कर्जापोटी NCDC

(पान ४ वर...☛)

| तापमान | | | |
|---|---|---|---|
| दिवस : 30⁰ उच्च | सूर्योदय : १३ तास ११ मिनिटे | 24k सोने प्रति १० ग्रॅम | चांदी प्रति किलो |
| रात्र : 23⁰ किमान | उगवणे : 06:04AM | रू.९९,४००/- | रू. १,१५,०००/- |
| | मावळणे : 07:15PM | 22k सोने प्रति १० ग्रॅम | डॉलर प्रति दर |
| | सूर्यास्त : ११ तास ०६ मिनिटे | रू. ९१,२००/- | रू.८५.४५ |
| | उगवणे : 07:07PM | | पेट्रोल : रू. १०३.५०/- |
| | मावळणे : 06:13AM | | डिझेल : रू. ९०.०३/- |

LIVE

# तर मुंबईवर हल्ला झालाच नसता...

**दै.चालु वार्ता वृत्तसेवा**

**मुंबई :** देशाच्या राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या शिफारशीने विशेष सरकारी वकील उज्वल निकम यांची राज्यसभेवर वर्णी लागली आहे. राज्यसभेवर खासदारकी मिळवून उज्वल निकम यांनी राजकीय कारकीर्दीला सुरुवात केली.

खासदारकी मिळाल्यानंतर उज्वल निकम यांनी एनडीटीव्हीला विशेष मुलाखत दिली. ज्यामध्ये त्यांनी त्यांच्या वकिलीच्या कार्यकाळाचा प्रवास मांडला. यावेळी बोलताना उज्वल निकम यांनी अभिनेता संजय दत्तचे नाव घेत २६७ जणांचा मृत्यू झालेल्या १९९३च्या मुंबई बॉम्ब स्फोटाबाबत सर्वात मोठे विधान केले.

**काय म्हणाले उज्वल निकम?**

याबाबत बोलताना उज्वल निकम म्हणाले की, 'संजय दत्त त्यावेळी निर्दोष होता आणि त्यांनी शस्त्रे ठेवली होती कारण त्याला बंदुकांची आवड होती. 'कायद्याच्या दृष्टीने त्यांनी गुन्हा केला होता. पण तो एक साधा माणूस आहे. मी त्याला निर्दोष मानतो. मला फक्त एकच गोष्ट सांगायची आहे. १२ मार्च रोजी झालेल्या बॉम्बस्फोटांच्या काही दिवस आधी, एक व्हॅन



**संजय दत्त बाबत उज्वल निकम यांचा खळबळजनक खुलासा !**

संजय दत्तच्या घरी आली. ती हँडग्रेनेड, एके-४७ सारख्या शस्त्रांनी भरलेली होती, अबू सालेम (गुंड दाऊद इब्राहिमचा साथीदार) ती घेऊन आला होता. संजयने काही हँडग्रेनेड आणि बंदुका घेतल्या. नंतर त्याने ते सर्व परत केले आणि फक्त एके-४७ सोबत ठेवली. जर त्याने त्यावेळी पोलिसांना माहिती दिली असती तर पोलिसांनी तपास केला असता आणि मुंबई बॉम्बस्फोट कधीच झाला नसता.

त्यांनी सांगितले की 'संजय दत्तच्या वकिलाला याबद्दल देखील सांगितले होते की त्याच्याकडील एके-४७ ने कधीही गोळीबार झाला नाही. त्याची उपस्थिती आणि एक बंदी घातलेले शस्त्र त्याच्याकडे असणे ही 'एक गोष्ट' आहे. परंतु पोलिसांना माहिती न देणे हे स्फोट घडवून आणण्याचे कारण होते. यावेळी उज्वल निकम यांनी शस्त्रास्त्र कायद्याअंतर्गत अभिनेता संजय दत्तला दोषी ठरवल्यानंतर त्याने केलेले कोर्टातील कधीही समोर न आलेले एक संभाषणही सांगितले.

शिक्षा झाल्यानंतर मी त्याचे भाव बदलताना पाहिले. मला वाटले की तो धक्काबुक्की करण्याच्या तयारीत आहेत. तो निकाल स्वीकारू शकला नाही आणि तो घाबरलेला दिसत होता.तो साक्षीदार चौकटीत होता आणि मी जवळच होतो आणि मी त्यांच्याशी बोललो. तुम्हाला आठवेल की तो शांत बसला आणि नंतर निघून गेला, असे त्यांनी पुढे सांगितले. मी संजयला सांगितले, 'संजय असे करूनको. मीडिया तुला पाहत आहे. तू एक अभिनेता आहेस. जर तू शिक्षेला घाबरलेला दिसत असशील तर लोक तुला दोषी समजतील. तुला अपील करण्याची संधी आहे, असा मोठा खुलासाही उज्वल निकम यांनी केला.



# एक जिल्हा, एक उत्पादन २०२४: महाराष्ट्राची सुवर्ण कामगिरी !

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
ठाणे ग्रामीण - प्रतिनिधी
विकी जाधव

**नवी दिल्ली :** एक जिल्हा एक उत्पादन २०२४ अंतर्गत महाराष्ट्राने चमकदार कामगिरी केली असून राज्याला अ श्रेणीतील सुवर्ण पदक प्राप्त झाले आहे. यासह रत्नागिरी, नागपूर, अमरावती, नाशिक आणि अकोला या जिल्ह्यांनी कृषी आणि गैर-कृषी क्षेत्रातील आपल्या विशिष्ट उत्पादनांसाठी सुवर्ण, रौप्य, कांस्य आणि विशेष उल्लेख पुरस्कार पटकावले आहेत.

सोमवारी येथील भारत मंडपममध्ये राष्ट्रीय 'एक जिल्हा, एक उत्पादन' (ODOP) २०२४ पुरस्कार सोहळयाचे आयोजन करण्यात आला. या कार्यक्रमास केंद्रीय वाणिज्य व उद्योग मंत्री पीयूष गोयल, दिल्लीच्या मुख्यमंत्री रेखा गुप्ता आणि वाणिज्य व उद्योग राज्यमंत्री जितिन प्रसाद यांच्या प्रमुख उपस्थित पुरस्कारांचे वितरण करण्यात आले. महाराष्ट्राने आपल्या उत्पादनांच्या नाविन्यपूर्णतेने, उच्च दर्जाने आणि वैशिष्ट्यपूर्ण गुणवत्तेने राष्ट्रीय स्तरावर आपले वर्चस्व प्रस्थापित केले.

**महाराष्ट्राची 'एक जिल्हा, एक उत्पादन' उपक्रमात सुवर्ण कामगिरी**

'एक जिल्हा, एक उत्पादन' (ODOP) उपक्रम भारत सरकारचा एक महत्त्वाकांक्षी उपक्रम आहे, ज्याचा उद्देश प्रत्येक जिल्ह्याच्या वैशिष्ट्यपूर्ण उत्पादनांना प्रोत्साहन देऊन स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना देणे आणि जागतिक बाजारपेठेत त्यांचा ठसा उमटवणे आहे. या उपक्रमांतर्गत २०२४ च्या पुरस्कार समारंभात महाराष्ट्राने आपली उत्कृष्टता सिद्ध करून विविध श्रेणीत पुरस्कार मिळविले. हे पुरस्कार जिल्हा, राज्य आणि परदेशातील भारतीय दूतावास या तीन गटांमध्ये वितरित करण्यात आले. परदेशातील भारतीय दूतावासांनी या समारंभात दूरदृश्य प्रणालीद्वारे सहभाग घेतला, ज्यामुळे या कार्यक्रमाला आंतरराष्ट्रीय स्तरावरही महत्त्व प्राप्त झाले. राज्यांच्या 'अ' श्रेणीत महाराष्ट्रासह आंध्र प्रदेश, पंजाब आणि उत्तर प्रदेश राज्यानेही




सुवर्णपदक मिळवले आहे. राज्याच्यावतीने उद्योग संचालनालयाचे विकास आयुक्त दीपेंद्र सिंग कुशवाह यांनी हा पुरस्कार स्वीकारला.

**कृषी क्षेत्रातील महाराष्ट्राचे यश**

महाराष्ट्राने कृषी क्षेत्रात आपली आघाडी कायम राखत विविध जिल्ह्यांच्या उत्पादनांना मान्यता मिळवली आहे. या अंतर्गत खालील जिल्ह्याना आपल्या वैशिष्ट्यपूर्ण कृषी उत्पादनांसाठी पुरस्कार पटवावले.

**रत्नागिरीच्या हापूस आंब्याला सुवर्णपदक**

जागतिक स्तरावर 'आंब्यांचा राजा' म्हणून ओळखला जाणारा रत्नागिरी जिल्ह्याचा हापूस आंबा यंदाही अव्वल ठरला आहे. कृषी क्षेत्रातील अ श्रेणीअंतर्गत जिल्ह्याने प्रथम स्थान मिळवले आहे. हापूस आंब्याची गोड चव, उत्कृष्ट गुणवत्ता आणि जागतिक बाजारपेठेतील मागणी यामुळे रत्नागिरी जिल्ह्याला हे यश मिळाले आहे. रत्नागिरीचे जिल्हाधिकारी एम. देवेंद्र सिंह यांनी पुरस्कार स्वीकारला.

**नागपूरी संत्र्यांना रौप्यपदक**

नागपूर जिल्ह्याच्या प्रसिद्ध संत्र्यांनी कृषी क्षेत्रातील अ श्रेणीअंतर्गत द्वितीय स्थान प्राप्त केले असून नागपूर संत्र्यांनी आपल्या रसाळ चवीने आणि जागतिक दर्जाच्या गुणवत्तेने देश-विदेशात ख्याती मिळवली आहे. या यशामुळे नागपूर जिल्ह्याचा कृषी वारसा आणखी समृद्ध झाला आहे. रौप्यपदकाचा पुरस्कार नागपूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी यांनी स्वीकारला.

**अमरावतीच्या मंदारिन संत्र्यांना कांस्यपदक**

अमरावती जिल्ह्याने आपल्या मंदारिन संत्र्यांसाठी कृषी क्षेत्रातील अ श्रेणी अंतर्गत तृतीय स्थान मिळवले. संत्रा उत्पादनातील सातत्य, गुणवत्ता आणि बागायती क्षेत्रातील उत्कृष्ट प्रयत्न यामुळे अमरावतीने हे यश संपादन केले. अमरावती जिल्हा उद्योग केंद्रांचे महाव्यवस्थापक नीलेश निकम यांनी कांस्यपदकाचा पुरस्कार स्वीकारला.

**नाशिकच्या द्राक्षे आणि मनुकांना विशेष उल्लेख पुरस्कार**

नाशिकने आपल्या द्राक्षे आणि मनुकांसाठी (ग्रेप्स अँड रेझिन्स) कृषी क्षेत्रातील श्रेणी अ अंतर्गत विशेष उल्लेख पुरस्कार मिळवला. नाशिकच्या द्राक्षांनी आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत आपले स्थान भक्कम केले आहे, आणि या यशाने नाशिकच्या कृषी क्षेत्रातील योगदानाला मान्यता मिळाली. हा पुरस्कार नाशिकचे जिल्हाधिकारी जलज शर्मा यांनी स्वीकारला.

**गैर-कृषी क्षेत्रातील यश**

अकोला जिल्ह्याने गैर-कृषी क्षेत्रातील श्रेणीतील ब अंतर्गत कापूस जिनिंग आणि प्रेसिंगसाठी विशेष उल्लेख पुरस्कार प्राप्त केला आहे. कापूस उत्पादन आणि प्रक्रिया क्षेत्रातील अकोल्याची प्रगती आणि औद्योगिक विकास यामुळे हा पुरस्कार मिळाला आहे. हा पुरस्कार जिल्हा उद्योग केंद्र, अकोल्याचे महाव्यवस्थापक संतोष बनसोड यांनी स्वीकारला.

## काय तो उतने चाळीचा रोड, काय तो चीखोल, काय ते रोडवर साचलेल पाणी, काय ते हैराण जनता, काही ओके नाही बर का?'

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
कल्याण - प्रतिनिधी
स्वप्नील देसले

**कल्याण/टिटवाळा :** टिटवाळा शहरातील उतने गाव. या गावातील चाळीत काहीच सुधारणा नाहीत. १०-१२ वर्षांपासून लोक राहतात पण लोकांना यायला-जायला रोडच नाही. रहायला घर आहेत, पण चालायला रोड नाहीत, रोडवर लाइट नाही. लहान मुल घसरून पडत आहेत. रात्री साप, विंचू यांच्यासारखे विषारी जीव फिरत असतात. लोकांनी पुढे करावेत तरी काय? ग्रामपंचायत काही लक्ष देत आहेत की नाहीत? हा प्रश्न लोकांना उपस्थित होत आहे.

घर घेतांना बिल्डर ने सांगितल होत, की लहान मुलांना खेळण्यासाठी गार्डन देऊ, पाण्याची सोय उपलब्ध करून देण्यात येणार, पण ते एक स्वप्न अर्धवट होत. ते कधी पुर्ण होईल असा प्रश्न



**'रोडवर चीखोल का चीखलात रोड' अशी दयनीय अवस्था झाली आहे उतने चाळीचि**

तेथील स्थानिक लोकांकडून केला जात आहे. प्रशासन व ग्रामपंचायत उतने चाळीत असलेले सर्व समस्येवर काही मार्ग काढतील की नाहीत ? काही अपघात होइल याची वाट पहात आहेत का?हा प्रश्नाचे उत्तर गोलार्धात.

# ऑनलाईन सेवा देत नागरिकांचे जीवन सुखकर करा

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
नागपूर - प्रतिनिधी
सतीश कडू

**नागपूर :** शासनाकडून देण्यात येणाऱ्या सेवा नागरिकांपर्यंत जलद पोहोचवून नागरिकांचे जीवन सुखकर बनवण्यासाठी ऑनलाईन सेवा देण्याचे धोरण अवलंबले आहे. यासाठी सर्व सेवा ऑनलाईन व जलद देऊन नागरिकांचे जीवन सुखकर करा, असे आवाहन महा आयटी कॉर्पोरेशन मुंबईचे व्यवस्थापकीय संचालक संजय काटकर यांनी केले.

सदर येथील नियोजन भवन येथे जिल्ह्यातील आपले सेवा केंद्र चालकांसोबत सेवा हमी कायद्याची अंमलबजावणी व ऑनलाईन सेवा पुरवणाऱ्या केंद्र चालकांच्या क्षेत्रीय कामकाजाबाबत आयोजित बैठकीत काटकर बोलत होते. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी अनुप खांडे, महाव्यवस्थापक महाआयटी मकरंद पुरटकर, फारूख शेख जिल्हा प्रकल्प व्यवस्थापक नागपूर आणि उमेश



## महा आयटी कॉर्पोरेशनचे व्यवस्थापकीय संचालक संजय काटकर यांचे आवाहन

घुग्घुसकर जिल्हा व्यवस्थापक भंडारा आदींची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी जिल्हाधिकारी कार्यालय व जिल्हा परिषदेच्या माध्यमातून नागरिकांना देण्यात येणाऱ्या सर्व ऑनलाईन सेवांचा आढावा घेतल्यानंतर जिल्ह्यातील सेवांबाबत काटकर यांनी समाधान व्यक्त केले.

काटकर म्हणाले की, सेवा हमी कायद्यांतर्गत शासनाकडील सेवा मिळवणे हा नागरिकांचा अधिकार झाला असून त्या सेवा अधिसुचित होऊन लवकर मिळण्यासाठी ऑनलाईन उपलब्ध झाल्या पाहिजेत हा शासनाचा मानस आहे. शासनाने १५ ऑगस्टपर्यंत जास्तीत जास्त सेवा ऑनलाईन करण्याचे निर्देश दिले आहेत. नागरिकांच्या समस्या सोडवू शकलो तरच नागरिकांमध्ये प्रशासनाविषयी सकारात्मक वातावरण होईल. ऑनलाईन सेवा देताना येणाऱ्या तांत्रिक अडचणी दूर करण्यासाठी वापरण्यात येणारे तंत्रज्ञान अद्ययावत करण्यात येणार आहे.

# महामार्गावरील कोंडी; रोजच प्रवाशांच्या बोकांडी

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
वाघोली - प्रतिनिधी
स्वरुप गिरमकर

**(पुणे) :** अहिल्यानगर वरून पुण्याकडे येताना वाघोली पासून रस्त्यावरील वाहतूक कोंडीची समस्या परिसरातील नागरिकांच्या नशिबाला पूजलेली आहे. यामुळे नागरिकांची सुरक्षा व आरोग्य धोक्यात आले आहे. प्रशासनाची बोटचेपी भूमिका आणि नियमांना केराची टोपली दाखवणाऱ्या राजकीय अनास्थेमुळे वाघोली ते खराडी जकात नाका रस्त्यावर वाहतूक कोंडीचा प्रश्न गंभीर झाला आहे.वाहनचालकांना तासन तास वाहतूक कोंडीत अडकून पडावे लागत आहे. इंधन व वेळेचा अपव्यय होत असल्याने वाहनचालकांना मनस्तापाला सामोरे जावे लागत आहे. उबाळेनगर ते खराडी जकात नाका मार्गावर वाहतूक कोंडी नित्याची झाली आहे. त्यामुळे वाहनचालकांना दररोज प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे.या एक किलोमीटरच्या मार्गांवर वाहतूक कोंडीची समस्या दिवसेंदिवस अतिशय गंभीर होत चालली आहे. हा एक



किलोमीटरचा रस्ता पास करण्यासाठी वाहचालकाला सुमारे पाऊणतास ते एक तास लागत आहे. सकाळी कार्यालयीन कामकाजावेळी व सायंकाळी कार्यालये सुटल्यावर पुण्यात जाणारे कर्मचारी व नागरिक मोठ्या प्रमाणात याच रस्त्यांवरून वाहतूक करत असल्याने सकाळी व विशेषतः सायंकाळी वाहतूक कोंडीचा प्रचंड त्रास नागरिकांना सहन करावा लागत आहे. अवजड वाहनांची सातत्याने वाहतूक, अर्धवट विकासकामे अशा अडथळ्यांच्या शर्यतीत दररोज सुमारे दीड लाख वाहनांची वर्दळ या रस्त्यावर सुरूअसते. त्यामुळे वाहनांच्या गर्दीत परिसराचा श्वास कोंडल्यासारखी स्थिती आहे.

वाहतुकीची कोंडी फोडण्यासाठी व पर्यायी उपाययोजना करण्यासाठी कोणीही पुढे येत नाही. जनता भरडून निघत असताना नेतेगिरी करत फिरणारे तसेच फुटकळ कारणांसाठीही आंदोलन करणारे स्वयंघोषित नेते कुठल्या बिळात लपून बसले आहेत? ते या समस्येवर आवाज का उठवत नाहीत? असा सवाल उपस्थित होत आहे.

**वाहतूक पोलिसांवर प्रश्नचिन्ह**

पुणे-अहिल्यानगर महामार्गावर वाहतूक कोंडी ही नित्याची बाब झाली आहे. चौकाचौकात वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी पोलिसांच्या नेमणुका करण्यात आलेल्या आहेत. मात्र त्याऐवजी ते ये-जा करणारे शेतकरी, नोकरदार व सर्वसामान्य नागरिकांकडून पठाणी वसुली करीत असल्याच्या तक्रारी येत असून वाहतूक विभागातील पोलिसांचे काम वाहतूक नियमन की वसुली असा प्रश्न वाहनचालकांना पडला आहे.

# मुख्यमंत्री प्रशासकीय गतिमानता अभियान

## पालकमंत्र्यांच्या मार्गदर्शनाखाली गावे होवू लागली प्लास्टीकमुक्त

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
कोल्हापूर - प्रतिनिधी
सदामते बाळासाहेब

**कोल्हापूर :** जिल्ह्यात पालकमंत्री प्रकाश आबिटकर यांच्या पुढाकाराने मुख्यमंत्री प्रशासकीय गतिमानता अभियान राबविले जात आहे. १ मे ते १५ ऑगस्ट २०२५ या कालावधीत हे अभियान राबविले जात आहे. या अभियानांतर्गत प्रशासकीय कामात गती यावी यानुषंगाने सर्व विभागांमार्फत राबविण्यात येणाऱ्या योजना, अभियान आणि उपक्रमांना १५ ऑगस्ट २०२५ पर्यंत साध्य निश्चितीसाठी कालावधी देण्यात आला आहे. पाणी व स्वच्छता विभाग, जिल्हा परिषद कोल्हापूर या विभागाने देखील मुख्यमंत्री प्रशासकीय गतिमानता अभियानामध्ये जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यातील किमान १ गाव याप्रमाणे १२ तालुक्यातील १२ गावे १५ ऑगस्ट २०२५ पूर्वी प्लास्टीकमुक्त करण्याचे उद्दीष्ट निश्चित केले आहे.

### प्लास्टीक कचरा व्यवस्थापनाला वेग

जिल्ह्याचे पालकमंत्री प्रकाश आबिटकर यांच्या मार्गदर्शनाखाली या अभियान कालावधीत माहे जुलैपर्यंत जिल्ह्यातील ७ गावे प्लास्टीकमुक्त झाली असून उर्वरित ५ गावे माहे जुलैअखेर प्लास्टीकमुक्त करुन उद्दीष्ट १०० टक्के साध्य करण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

**जिल्ह्यातील प्लास्टीकमुक्त झालेली गावे -**

वाटंगी (ता. आजरा), झांबरे (चंदगड), मुगळी (ता. गडहिंग्लज), मजरे कासारवाडा (ता. राधानगरी), गोलिवडे (ता. पन्हाळा), ऐनवाडी (ता. शाहूवाडी), फणसवाडी (ता. भुदरगड)

**गावे प्लास्टीकमुक्त करण्यासाठी राबविण्यात आलेले उपक्रम -**

मुख्यमंत्री प्रशासकीय गतिमानता अभियानांतर्गत जिल्हा स्तरावरुन प्लास्टीकमुक्त गावाचे उद्दीष्ट निश्चित करण्यात आले. त्यानुसार तालुका स्तरावरुन गावांची निवड करण्यात आली. या उपक्रमामध्ये करावयाच्या कालबध्द कार्यवाहीबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी कार्तिकेयन एस. यांनी सर्व गट विकास अधिकारी यांना निर्देश दिले आहेत. तालुका स्तरावर बैठकांच्या माध्यमातून या गावातील सरपंच आणि ग्रामपंचायत अधिकारी यांना गावे प्लास्टीकमुक्त करण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत.

निवडलेल्या ग्रामपंचायतीमध्ये सर्वप्रथम मासिक ग्रामसभा आयोजित करुन एकल प्लास्टीकचा वापर थांबविण्याबाबत ठराव करण्यात आला. ग्रामस्थ, दुकानदार, व्यावसायिक, व्यापारी यांच्यामध्ये प्लास्टीकचा वापर न करण्याबाबत जनजागृती उपक्रम राबविण्यात आला. त्यानंतर गावातील सर्व व्यापारी, विक्रेते, दुकानदार यांना एकल प्लास्टीकचा वापर केल्यास दंडात्मक कारवाई होणार असल्याबाबत ग्रामपंचायतीव्दारे एकल प्लास्टीकचा वापर केल्यास दंडात्मक कारवाई होणार असल्याबाबत ग्रामपंचायतीव्दारे नोटीस देण्यात आल्या.

१५ जून २०२५ पासून तालुकास्तरीय अधिकारी व ग्रामपंचायत कर्मचारी यांच्या पथकाव्दारे स्थानिक दुकाने, आठवडी बाजार येथे एकल प्लास्टीक जप्त करण्याची मोहीम राबविण्यात आली.

या पध्दतीने जनजागृती उपक्रम आणि दंडात्मक कारवाईच्या माध्यमातून गावातील एकल प्लास्टीक हटविण्याची मोहीम यशस्वी होत आहे. १५ ऑगस्ट २०२५ पूर्वी उर्वरित तालुक्यातील पाच गावे प्लास्टीकमुक्त करण्याची कार्यवाही पाणी व स्वच्छता विभाग जिल्हा परिषद कोल्हापूर यांच्या मार्फत सुरु आहे, अशी माहिती जल जीवन मिशनच्या प्रकल्प संचालक माधुरी परीट यांनी दिली आहे.

# शाळेला मिळाला शिक्षक

## पालक आनंदात, विद्यार्थी गळतीला रोख!

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
पुणे - प्रतिनिधी
ॲड.गुणाजी मोरे

**पुणे :** महानगरपालिकांच्या शाळांमध्ये पुरेसे शिक्षक नाहीत म्हणून अनेक दिवसांपासून पालक चिंतेत आहेत, शाळांमध्ये मोठ्या प्रमाणात विद्यार्थी गळती वाढलेली बघून कै. पतासी बाई छाजेड ई लर्निंग इंग्लिश मीडियम स्कूल बोपोडी येथे गेल्या एक वर्षापासून दोन शिक्षकांची कमतरता होती. शिक्षक नाहीत म्हणून विद्यार्थी गळतीची तक्रार काही पालकांनी आम आदमी पक्षाचे पदाधिकारी श्रीमती अँड अनिश (महिला शहर उपाध्यक्ष) विकास चव्हाण (संघटन मंत्री पुणे शहर) यांच्याकडे केली असता. शिक्षक आघाडी शहराध्यक्ष श्रीमती शितल विश्वनाथ कांडेलकर, शंकर थोरात (आप शहर उपाध्यक्ष) आणि अनेक पालक यांनी विजय कुमार थोरात 'प्राथमिक शिक्षण' उप आयुक्त पुणे महानगरपालिका यांच्याकडे शिक्षकाची मागणी केली. दोन दिवसाच्या कालावधीत त्यांच्याकडून शाळेला शिक्षक उपलब्ध करून दिला. यामुळे पालकांना दिलासा मिळाला. या शाळेत शिक्षक नसल्यामुळे चालू वर्षात सुमारे २५ विद्यार्थी



**'आप' ने केले शिक्षकाचे स्वागत!**


खाजगी शाळांमध्ये निघून गेली. परंतु सगळ्याच पालकांना खाजगी शाळा खिशाला परवडणारी नसते. म्हणून बरेच पालक अनेक दिवसांपासून चिंताग्रस्त होते. शाळेत शिक्षकच नसेल तर गुणवत्ता येणार कुठून हा प्रश्न उभा राहिला होता. त्या सर्वांनी आम आदमी पक्षाकडे तक्रार केली असता. या विषयाची दखल घेऊन त्वरित शिक्षक द्या अशी मागणी महानगरपालिका शिक्षण मंडळात केली. शिक्षण मंडळाकडून मिळालेल्या शिक्षक शनिवार दिनांक १२/०७/२०२५ शनिवार रोजी शाळेत रुजू होताच, शाळेत पालक सभा ही पार पडली. पालकांनी आभार मानत आनंद व्यक्त केला. या आनंदात भाग घेण्यासाठी आम आदमी पक्षाने त्वरित शाळेला भेट देऊन संबंधित शिक्षकचे स्वागत करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. मुख्याध्यापकांनाही कौतुकाची थाप देत सत्कार केला. यावेळेस महाराष्ट्र राज्य प्रवक्ते मुकुंद कीर्दत, शहर अध्यक्ष सुदर्शन जगदाळे, शिक्षक शिक्षक आघाडी शहराध्यक्ष श्रीमती शितल विश्वनाथ कांडेलकर, महिला आघाडी शहर उपाध्यक्ष श्रीमती अँन अनिश, शहर संघटन मंत्री विकास चव्हाण, आप सदस्य आकाश मुनियन, पालक सविता शिंदे, विलास मोरे व इतर असे सर्व उपस्थित होते.



# मंठयात प्रवीण दादा गायकवाड यांच्यावर झालेल्या भ्याड हल्ल्याचा तीव्र निषेध!

**दै.चालु वार्ता वृत्तसेवा**
**मंठा - प्रतिनिधी**
**सुरेश ज्ञा. दवणे**

**जालना (मंठा) :** १३ जुलै २०२५ रोजी अक्कलकोट येथे संभाजी ब्रिगेडचे राज्यस्तरीय नेते प्रवीण दादा गायकवाड यांच्यावर भाजपशी संबंधित गुन्हेगारी प्रवृत्तीच्या दीपक काटे याने साथीदारांसह शाईफेक करत भ्याड हल्ला केला. या घटनेचा मंठा तालुक्यात तीव्र निषेध होत असून, आज संभाजी ब्रिगेड, मंठा शाखा आणि समविचारी संघटनांच्या वतीने दी. १५जुलै रोजी तहसीलदारामार्फत मुख्यमंत्री व गृहमंत्री यांना निवेदन सादर करून तत्काळ कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली.



संभाजी ब्रिगेड, मंठा व सर्व समविचारी संघटना, समाज बांधव व विविध राजकीय पक्ष यांच्याकडून तहसीलदाराद्वारे मुख्यमंत्री व गृहमंत्री यांच्याकडे निवेदनाद्वारे आक्रमक इशारा

प्रवीण दादा यांच्यावर हल्ला म्हणजे...

'समता, बंधुता, आणि वैचारिक आंदोलनावर हल्ला!'

संभाजी ब्रिगेडच्या निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, प्रवीण दादा गायकवाड हे बुद्ध, शिव, फुले, शाहू, आंबेडकर यांचे विचार कार्यकर्त्यांपर्यंत पोहोचवण्याचे काम गेली अनेक वर्षे करत आहेत. त्यांनी अनेक बहुजन तरुणांना स्वावलंबी व उद्योजक बनवले आहे. अशा व्यक्तीवर सराईत गुन्हेगारांकडून हल्ला होणे म्हणजे वैचारिक क्रांतीला गप्प करण्याचा कट असल्याचा आरोप संघटनेने केला आहे.

**गुन्हेगार कोण? पक्ष पदाधिकारी !**

हल्लेखोर दीपक काटे हा केवळ गुन्हेगार नसून, भाजपच्या एका शाखेचा प्रदेश सचिव असल्याची माहितीही निवेदनात नमूद करण्यात आली आहे. त्यामुळे फक्त पोलिस कारवाई नव्हे, तर त्याला पक्षातून हकालपट्टी करावी, अशी जोरदार मागणी ब्रिगेडने केली.

**संभाजी ब्रिगेडचा स्पष्ट इशारा**

'जर कारवाई झाली नाही, तर 'जशास तसे' उत्तर देण्यास आम्ही मागे हटणार नाही. कायदा-सुव्यवस्थेच्या परिणामांना शासन जबाबदार राहील.'

असा ठाम इशारा देत संभाजी ब्रिगेड, मंठा, तसेच समविचारी संघटना, समाजबांधव व विविध राजकीय-सामाजिक पक्षांच्या वतीने हे निवेदन तहसील कार्यालयात सादर करण्यात आले. यावेळी संभाजी ब्रिगेडचे ता.अध्यक्ष बाळासाहेब खवने, प्रा.डॉ.पांडुरंग नवल,सुभाष जाधव, शेख ऐजाज, आसाराम झोल, एकनाथ काकडे, शरद बाहेकर,शरद घारे,प्रल्हाद शिरसाट, एकनाथ जाधव, अशोक हिवाळे,योगेश वायाळ, राजेश काळे,कृष्णा पवार, विशाल देशमुख,धोंडीराम घोरसड, शिवाजी शेवाळे, ताहीर बागवान, दिनकर बागल, गौतम मगर, केशव खराबे, नारायण ढाकरगे, भारत उघडे आदी उपस्थित होते.

# श्री गजानन महाराज पालखीचे भूममध्ये भक्तिभावाने स्वागत; शहर भक्तिमयतेने न्हाऊन निघाले !

**दै.चालु वार्ता वृत्तसेवा**
**धाराशिव - उपसंपादक**
**नवनाथ यादव**



**धाराशिव/भूम :** श्री गजानन महाराज संस्थान, शेगाव यांच्या ५६व्या पायी पालखी सोहळयाचे भूम नगरीमध्ये शतकोत्तर भक्तिभावाने स्वागत करण्यात आले. टाळ मृदंगाच्या गजरात, 'गण गण गणात बोते'च्या घोषात संपूर्ण शहर हरखून गेले होते. पावन दर्शनासाठी शहरवासीयांनी रस्त्यावर उभे राहत श्रद्धेने पालखीचे स्वागत केले. सर्वत्र फुलांचे सडे, रांगोळ्यांची सजावट आणि भक्तांची ओसंडून वाहणारी गर्दी दिसून आली. ढोल-ताशांच्या निनादात, पालखी ज्या ज्या रस्त्यांवरून गेली, त्या त्या परिसरात उत्साह ओसंडून वाहताना दिसला.

याप्रसंगी मा.नगराध्यक्ष विकासरत्न संजय गाढवे आणि माजी नगराध्यक्षा सौ. संयोगिताताई गाढवे यांनी सपत्नीक श्रींच्या पालखीचे दर्शन घेतले आणि गजानन महाराजांचे कृपाशीर्वाद प्राप्त केले.यावेळी युवा नेते, साहिल उद्योग समुहाचे साहिल गाढवे, उद्योजक संजय साबळे, युवा उद्योजक सुरज गाढवे, रणजित साळुंके, राम बागडे, बाळासाहेब अंधारे, सुशेन जाधव, सुनील थोरात, बालाजी माळी, उद्योजक रणजित साळुंके, यांच्या सह भूम नगरपालिकेचे नगर अभियंता गणेश जगदाळे, व नप भूम चे अन्य कर्मचारी यांच्या वतीने पालखीचे स्वागत करण्यात आले.या दिव्य सोहळ्यास साक्षी राहण्यासाठी अनेक सामाजिक, धार्मिक संस्था, विविध मान्यवर, नगरसेवक, तसेच हजारो भाविक उपस्थित होते. या आगळ्यावेगळ्या सोहळ्यामुळे भूम नगरीत भक्तीचा महासागर उसळल्याचे दृश्य पाहायला मिळाले.

# समाज सेवक कृष्णा महाडिक यांचे रायगड मधील शाळासाठी महत्वाचं योगदान...

**दै.चालु वार्ता वृत्तसेवा**
**म्हसळा - प्रतिनिधी**
**अंगद कांबळे**

**म्हसळा :** समाजसेवक कृष्ण महाडिक यांच्या प्रयत्नाने रायगड मधील ग्रामीण भागातील मुलांना दर्जेदार शिक्षण भेटावे त्यासाठी विद्यार्थ्यांना भौतिक सुविधा उपलब्ध करून देणे हा महत्त्वाचा उद्देश ठेवून समाजसेवक श्री कृष्णा महाडिक यांच्या प्रयत्नातून पीएम श्री रायगड जिल्हा परिषद प्रशाला भरडखोल येथील शाळेत जवळ जवळ साडे तीनशे विद्यार्थी या शाळेत शिक्षण घेत असून या शाळेला यापूर्वीही अर्थिक-दानशूर दाते व श्रीकृष्णजी महाडिक यांच्या प्रयत्नातून अनेक भौतिक सुविधा व प्रशस्त अशी इमारत बांधून देण्यात आलेली आहे तसेच या शाळेत शिकणाऱ्या मुलीची संख्या जवळ जवळ दीडशे ते पावणे १७६ इतकी असून या शाळेला लक्ष्मी देवी दमानी जीतमल चालमल दमाननी ट्रस्ट मुंबई यांच्या माध्यमातून स्वच्छता ग्रहाचे उद्घाटन शाळा व्यवस्थापन समिती भरडखोर अध्यक्ष संतोष गोविंद वाघे यांच्या हस्ते व ज्येष्ठ समाजसेवक तथा रायगड भूषण कृष्णाजी महाडिक यांच्या उपस्थितीत पारपडले म्हसळा तालुक्यातील साळविंडे शाळेला ही आर्थिक सहकार्य केले असून विद्यार्थी शिकला पाहिजे काळा नुसार शिक्षणात बद्दल होत असतांना पालकांना आर्थिक जास्त त्रास होऊनय या साठी दमाणी ट्रस्ट च्या माध्यमातून संगणक, शिष्यवृत्ती, मुलींना सायकल, पेरोगान चप्पल, शालेय साहित्य, कपोस, वह्या, छत्री वाटप करण्यात आलेली असून महाडिक साहेबाना यांच्या माध्यमातून प्राथमिक विद्यामंदिर तळे (दगडी) शाळा, माध्यमिक शाळा उसर, माध्यमिक शाळा बोरघर, जिजामाता शाळा आगरवाडा,माध्यमिक शाळा खरवली, प्राथमिक शाळा खरवली आदिवासी वाडी, रातवड हायस्कूल महाड, न्यू इंग्लिश स्कूल चनेरे रा. जि.प शाळा मांदाटणे अश्या जवळपास २९ शाळा महाडिक साहेबांच्या माध्यमातून थोरदेणगीदार व लक्ष्मी दमाणी थोरदाते च्या अर्थसाह्यतून करण्यात आले असून भरडखोल येथील स्वच्छता ग्रहाचे उद्घाटन शाळा व्यवस्थापन समिती भरडखोर अध्यक्ष संतोष गोविंद वाघे यांच्या हस्ते व ज्येष्ठ समाजसेवक तथा रायगड भूषण कृष्णाजी महाडिक साहेब यांच्या उपस्थितीत पारपडले रायगड भूषण महाडिक साहेब यांच्या विशेष प्रयत्नातून मुलांना दर्जेदार शिक्षण मिळावे ह्या स्तुत्य हेतूने मागील अनेक वर्षांपासून शाळाच्या वैभवात वाढ झालेली दिसून येत आहे. यावेळी यशवंत हरिचंद्र पावशे शाळेचे मुख्याध्यापक हेमंत रामा पाटील आनंद पांचाळ,शिक्षक वर्ग व कर्मचारी उपस्थित होता.



पीएम श्री रायगड जिल्हा परिषद मराठी शाळा भरडखोल येथे विद्यार्थ्यांसाठी स्वच्छता गृह उदघाट्न

# अंबड- घनसावंगी रोड वलखेडा फाट्यावरती भीषण अपघात

**दै.चालु वार्ता वृत्तसेवा**
**अंबड - प्रतिनिधी**
**ज्ञानेश्वर साळुंके**

**अंबड :** दि १५ रोजी अंबड-घनसावंगी रोड वरती वलखेडा पाटीजवळ फोर व्हीलर व दुचाकीचा अपघात झाला आहे. या अपघातात फोर व्हीलर ही क्रियेटा व दुचाकी पल्सर होती. हा अपघात समोरासमोर झाला असून यात दोन सख्या भावांना गंभीर जखमी झाली आहे. सदरील घटना ही आज सकाळी ९:३० वाजेच्या सुमारास घडली आहे. यात चार चाकी क्रमांक MH.34 BR 7011 व दुचाकी क्र MH.23 AM 4329 असून या अपघातात जखमींची नावे बाळू अशोक बरडे वय ३८ व दीपक अशोक बरडे वय २५ दोघे राहणार खडकेश्वर तालुका अंबड असे आहे. घटनास्थळावरून नागरिकांनी अपघाताची माहिती १०८ ला दिली असता. ॲम्बुलन्स द्वारे जखमींना अंबड उपजिल्हा रुग्णालय येथे दाखल करण्यात आले. त्यावेळी डॉ. डमाळे व डॉ.श्रीकांत यांनी जखमी वरती उपचार केला आहे. या अपघातात बाळू यांना मांडीलाइजर झाली आहे तर दीपक बरडे यांना उजव्या पायाला फॅक्चर झाले आहे. अंबड येथील उपजिल्हा रुग्णालयात येथे जखमीवरती उपचार सुरु आहे.



## अपघातात दोन जण गंभीर जखमी

# देगलूर येथील मानव्य विकास विद्यालय शाळेतील तीन विद्यार्थी शिष्यवृत्तीधारक



**दै.चालु वार्ता वृत्तसेवा**
**देगलूर - प्रतिनिधी**
**एकनाथ गाडीवान**

**देगलूर :** येथील मानव्य विकास विद्यालय शाळेतील तीन विद्यार्थी महाराष्ट्र राज्य पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेत (इयत्ता ८ वी) घवघवीत यश मिळवत शिष्यवृत्ती धारक बनले आहेत. यातील शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांना इयत्ता १० वी पर्यंत शिष्यवृत्ती मिळेल.विशेष म्हणजे हे तिन्ही विद्यार्थी सर्वसाधारण गटातून शिष्यवृत्तीधारक झालेले आहेत . यामध्ये १. संजना विजयराव मरखेले (जिल्ह्यातून २२ वी), २. ओमकार किशनराव जाधव (जिल्ह्यातून १२८ वा ), ३. योगेश माधवराव मंगरूळे (जिल्ह्यातून १३९ वा) या सर्व शिष्यवृत्तीधारक यशस्वी विद्यार्थ्यांचे पुष्पहार घालून सत्कार करण्यात आले. व त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आले. याप्रसंगी उपस्थित म्हणून, विद्यालयातील मुख्याध्यापक संतोष कोल्हे, उपमुख्याध्यापक श्याम कोल्हे, पर्यवेक्षक शरद हांद्रे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी शाळेतील सर्व शिक्षक वृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# देवळालीत ट्रॅक्टर चालकांसाठी स्पर्धेचा थरार

**दै.चालु वार्ता वृत्तसेवा**
**धाराशिव - उपसंपादक**
**नवनाथ यादव**



२० जुलै रोजी मैदान गाजवण्यासाठी सज्ज व्हा !

**धाराशिव/भूम :** ट्रॅक्टर चालवण्याचे कौशल्य शेतामध्येच नाही तर आता स्पर्धेच्या मैदानातही दाखवण्याची अनोखी संधी मिळणार आहे! युवानेते समाधान सातव यांच्या वाढदिवसानिमित्त पैलवान ग्रुप महाराष्ट्र राज्य यांच्यावतीने २० जुलै २०२५, सकाळी १० वाजता देवळाली येथे भव्य ट्रॅक्टर रिव्हर्स स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेत कुशल ट्रॅक्टर चालकांना आपले कौशल्य सादर करण्यासाठी खुलं व्यासपीठ मिळणार आहे. या उपक्रमास माजी मंत्री आ.प्रा.डॉ. तानाजीराव सावंत यांचे शुभेच्छा लाभल्या असून, कार्यक्रमाला मा.जिल्हा परिषद उपाध्यक्ष धनंजय सावंत हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. युवा नेते सागर खराडे व सामाजिक कार्यकर्ते युवराज (काका) तांबे यांचेही विशेष मार्गदर्शन लाभले आहे.

स्पर्धेसाठी खालीलप्रमाणे आकर्षक बक्षिसे जाहीर करण्यात आली आहेत: प्रथम क्रमांक ७००० रुपये व ट्रॉफी, द्वितीय क्रमांक ५००० रुपये व ट्रॉफी, तृतीय क्रमांक ३००० रुपये व ट्रॉफी, तर चतुर्थ व पंचम क्रमांकासाठी आकर्षक ट्रॉफी ठेवण्यात आली आहे. स्पर्धेसाठी नोंदणी व काही नियम अटी असून, अंतिम नोंदणी १९ जुलै रोजी दुपारी १२ वाजेपर्यंत स्वीकारली जाणार आहे. स्पर्धकांनी स्वतःचे ट्रॅक्टर व चालकासह उपस्थित राहावे. वाहनाचे सर्व कागदपत्रे आणि वैध परवाना (लायसन्स) अनिवार्य आहे. स्पर्धेतील विजेते वेळेच्या आधारे आणि नियमांनुसार पंचांच्या निर्णयावर ठरणार आहेत. ट्रॅक्टरप्रेमी, शेतकरी व युवकांसाठी ही स्पर्धा विशेष आकर्षण ठरणार आहे. त्यामुळे सर्वांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# धनंजय मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त जवळगाव येथे सामाजिक उपक्रमांचे आयोजन

**दै.चालु वार्ता वृत्तसेवा**
**बीड /अंबाजोगाई- प्रतिनिधी**
**किशोर फड**


**जवळगाव (ता. अंबाजोगाई) :** आज राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते व धनंजय मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त गावातील उपसरपंच लक्ष्मण भैय्या पवार यांच्या पुढाकाराने गरजू महिलांना साडी-चोळीचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमात विविध सामाजिक उपक्रम राबवून वाढदिवस साजरा करण्यात आला. कार्यक्रमास मा. पंचायत समिती अंबाजोगाईचे उपसभापती तानाजी भैय्या देशमुख, युवक नेते व समाजसेवक गणेश देशमुख, रजत जेधे तसेच ग्रामपंचायत सदस्य आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. या उपक्रमांमुळे गावकरी आणि पंचक्रोशीतील नागरिकांतून समाधान व्यक्त होत असून, उपसरपंच लक्ष्मण भैय्या पवार यांनी केलेल्या सामाजिक बांधिलकीचे सर्वत्र कौतुक होत आहे. समाजातील दुर्बल घटकांसाठी राबवलेले उपक्रम खऱ्या अर्थाने लोकसेवेचे दर्शन घडवणारे ठरले.



# अखिल भारतीय मातंग संघटनेच्या जिल्हा कार्याध्यक्षपदी दादाभाऊ ढवळे यांची निवड

**दै.चालु वार्ता वृत्तसेवा**
**मंठा - प्रतिनिधी**
**सुरेश ज्ञा. दवणे**

**जालना (मंठा) :** तालुक्यातील शिवनगिरी येथील दादाभाऊ ढवळे यांनी केलेल्या समाज कार्याची पावती म्हणून त्यांची आखिल भारतीय मातंग संघटनेच्या जिल्हा कार्याध्यक्षपदी दी ०५जुलै रोजी नियुक्ती करण्यात आली आहे. सदर नियुक्ती ही संघटनेच्य अध्यक्षा श्रीमती कुसूमताई बाबासाहेब गोपले यांनी केली असून संघटनेचे ध्येय धोरण हे तळागळातील जनतेपर्यंत पोहचवावे, असे या नियुक्ती पत्रात म्हटले आहे. त्यांना पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या आहे नियुक्तीबदूल ढवळे यांचे सर्वस्तरातून अभिनदन होत आहे.



# महाराष्ट्र राज्य शिवपानंद शेतरस्ता चळवळीचे शरद पवळे यांची संभाजीनगर येथे समन्वय नियोजन बैठक

**दै.चालु वार्ता वृत्तसेवा**
**वैजापूर - प्रतिनिधी**
**अनिल सुर्यवंशी**

**वैजापूर :** महाराष्ट्रातील शेतकरी राजाला त्याच्या प्रगतीला आड येणारा महत्त्वाचा प्रश्न म्हणजे त्याला न मिळणारा शेत रस्ता यासाठी शरद पवळे यांनी शिव पानंद शेत रस्ता चळवळ सुरूकेली. संपूर्ण छत्रपती संभाजी नगर जिल्ह्यातील रस्ता पीडित शेतकऱ्यांशी चर्चा करण्यासाठी १६ जुलै दुपारी १२ वाजता शासकीय विश्रामगृह येथे समन्वय नियोजन बैठक आयोजित केली आहे. या बैठकीसाठी संपूर्ण जिल्ह्यातील शेत रस्ता व शिव रस्ता पीडित शेतकऱ्यांनी जास्तीत जास्त संख्येने असे आव्हान शरद पवळे यांनी केले आहे.



(पान १ वरून...)

## भारत-रशिया-चीन त्रिकुट ...

सोडवण्यासाठी पावले उचलली आहेत. अलिकडेच परराष्ट्र मंत्री जयशंकर यांनी बीजिंगमध्ये आपल्या चिनी समकक्षांना भेटून सीमेवरील तणाव कमी करण्याबद्दल चर्चा केली. चीनला भारताशी संबंध सामान्य करायचे आहेत. हे सहकार्य पुतिन यांचे स्वप्न साकार करण्याच्या दिशेने एक पाऊल आहे. दरम्यान, पाश्चात्य माध्यमे रशियाला 'एकटे', चीनला 'आर्थिक आक्रमक' आणि भारताला 'अनिश्चित भागीदार' म्हणून दाखवतात. या प्रचारामागे अमेरिकेला भीती आहे की, हे त्रिकूट त्याच्या जागतिक स्थितीला आव्हान देऊ शकते.

# ६०० किलोमीटरचा प्रवास...

## (खांद्यावर नांगर, डोळ्यात स्वप्न)

लातूर जिल्ह्यातील अहमदपूर तालुक्यातून दोन शेतकरी – सहदेव होणाळे आणि गणेश सूर्यवंशी – तब्बल नऊ दिवस चालत, ६०० किलोमीटर पार करून ठाण्यात पोहोचतात, ही गोष्ट केवळ बातमी नसून आपल्या व्यवस्थेच्या संवेदनाहीनतेचं मूर्तिमंत उदाहरण आहे. ज्या राज्यात शेतकरी आपला कणा मानला जातो, तिथे त्याला स्वतःच्या हक्कांसाठी एवढा लांब प्रवास करावा लागावा, हे दुर्दैव नाही का? 'कर्जमाफी मिळावी, विम्याचे थकीत पैसे मिळावेत, वीजबिलांची सूट मिळावी,' या मागण्या अशक्य नाहीत. हे त्या माणसांच्या जगण्याचं मूलभूत हक्क आहेत. पण शासनाच्या दारात हे हक्क फक्त घोषणांपुरतेच राहतात.

सहदेव होणाळेंनी आपल्या खांद्यावर नांगर घेतला आणि महाराष्ट्राच्या राजकारणाला एक आरसा दाखवला. पाठीवरचा पोत आणि मनावरचं ओझं दोन्ही घेऊन ते निघाले. ऊन तापलं, पाऊस कोसळला, तरी पाय थांबले नाहीत. कारण त्यांच्या पाठीशी कुणी नाही, आणि मनात एकच प्रश्न – 'आमच्या जगण्याला काय किंमत आहे?'

कर्जबाजारीपणा हा मराठवाड्यात नवीन नाही. शेतकऱ्यांचे प्रश्न जुने आहेत, पण उत्तरं अजूनही सापडलेली नाहीत. आत्महत्यांची मालिका थांबलेली नाही. त्या मृत्यूंचा वापर राजकीय भाषणांत होतो, पण प्रत्यक्ष मदत होताना दिसत नाही. हेच जाणवत असताना या दोन शेतकऱ्यांनी आत्महत्येऐवजी संघर्षाची वाट निवडली. म्हणून त्यांच्या या प्रवासाचं मोल अपार आहे. हा फक्त दोन माणसांचा लढा नाही. हा लाखो शेतकऱ्यांचा आवाज आहे. आपल्या मातीवर नांगर चालवणाऱ्या हातांनी आपल्या हक्कासाठी रस्ता चालत गाठला, ही घटना आपल्या व्यवस्थेची अपयशाची साक्ष आहे. सहदेव होणाळेंची तब्येत प्रवासात खालावली. या संघर्षातून त्यांना काय मिळणार, हे ठरवणं आता सरकारच्या हातात आहे. पण एक लक्षात घ्यायला हवं – 'जर एखाद्याला आपल्या जगण्यासाठी मंत्रालयाच्या पायऱ्या झिजवाव्या लागतात, तर ती लोकशाहीची शरम आहे.' या संपादकीयातून एकच मागणी – या दोन शेतकऱ्यांचा सन्मान फक्त सहानुभूतीने करू नका. त्यांची मागणी मान्य करा. त्यांच्यासारख्या हजारो शेतकऱ्यांना आत्महत्येच्या उंबरठ्यावरून परत आणायचं असेल, तर तातडीची आणि ठोस कारवाई हवी. कर्जमाफी, विमा रक्कम आणि योग्य दर हे केवळ आश्वासन न राहता अंमलात आणले गेले पाहिजेत.

ही कहाणी नुसती एक बातमी म्हणून वाचून पुढे जाऊ नका. ही आपल्या सर्वांच्या जबाबदारीची आठवण आहे. कारण शेवटी, जर शेतकरी टिकला नाही, तर कोणतीही प्रगती, कोणतंही विकासाचं गाणं फक्त पोकळ गजर राहील.

**संपादकीय**

**लेखक : डि.एस.लोखंडे पाटील**
**मुख्य संपादक – दै.चालु वार्ता**
**संस्थापक / अध्यक्ष : स्वाभिमानी श्रमिक पत्रकार संघ (महाराष्ट्र राज्य)**

---

(पान १ वरून...) **मी अजूनही राष्ट्रवादी काँग्रेसचा प्रदेशाध्यक्ष...**

च्या नियंत्रणातील डीआरटी कोर्टाच्या आदेशानुसार येत्या २० ऑगस्ट रोजी कारखान्याची ऑनलाईन लिलाव प्रक्रिया होईल. त्याची नोटीस कारखान्याच्या प्रवेशद्वारावर लावली आहे. त्यामुळे सभासद व कामगारांत संताप निर्माण झाला.

सहकाराची मरगळ दूर करण्यासाठी प्रयत्नाची गरज सरकार सांगते. दुसरीकडे शेकडो एकर जमीन व मालमत्तेवर डोळा ठेवून ती कोणाच्या तरी घशात घालण्याचा कुटील डाव केंद्रीय सहकार विभागाकडून खेळला जातो. त्याला प्रखर विरोध असून ही प्रक्रिया स्थगीत करून कारखाना भाडेतत्वावर द्यावा या मागणीसाठी मोर्चा काढण्याचे कामगार संघटनेने जाहीर केल्याचे कुबेर जाधव यांनी जाहीर केले आहे.

या कारखान्यावर सर्वाधिक कर्ज बँकांचे आहे. यामध्ये राज्य सहकारी बँकेचे १२४ कोटी, HDFC बँकेचे ३४ कोटी, कर्मचाऱ्यांचे थकीत वेतन, प्रॉव्हिडंट फंड व इतर मिळकती मिळून ४१ कोटी, साखर विकास निधी ३५ कोटी तसेच इतर बँकांचेही कर्ज प्रलंबित आहे. या स्थितीत केवळ एनसीडीसीच्या थकबाकीच्या आधारे लिलावाची प्रक्रिया राबवली जाणे, संशयास्पद आहे.

या संदर्भात एक कारखाना मोडीत निघत असताना व शेकडो कोटींची मालमत्ता खाजगी व्यक्तीला केवळ ६२ कोटींच्या प्रथामिक बोलीवर विक्री होणे अयोग्य आहे. याबाबत ज्या राज्य सहकारी बँकेचे १२४ कोटींचे कर्ज आहे, त्या बँकेचे माजी अध्यक्ष आणि विद्यमान उपमुख्यमंत्री अजित पवार हे अमित शहा यांच्याकडे आपले वजन खर्च करतील का? याची सभासद विचारणा करीत आहे.

---

# महाराष्ट्र राज्याचे मा.मंत्री आमदार धनंजय मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त संगमवाडी येथे वृक्षारोपण

**दै.चालु वार्ता वृत्तसेवा**
**कंधार – प्रतिनिधी**
**माधव गोटमवाड**




**कंधार :** महाराष्ट्र राज्याचे मंत्री आमदार धनंजय मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त कंधार तालुक्यातील संगमवाडी ग्रामपंचायत कार्यालय तर्फे वृक्षारोपण करून वाढदिवस साजरा करण्यात आला. वातावरणात सातत्याने बदल होत आहे त्यामुळे पर्यावरणाचा समतोल ढासळत चालला आहे. पर्यावरणाचा प्रश्न सर्व जगाला भेडसावत आहे. पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी वृक्षारोपण व त्यांचे संवर्धन ही आजच्या काळाची मोठी गरज लक्षात घेऊन संगमवाडी ग्रामपंचायत कार्यालयाचे सरपंच चक्रधर पाटील घुगे यांच्या पुढाकाराने ग्रामपंचायत सहकारी यांना वृक्षारोपणाचे महत्त्व पटवून मोठ्या प्रमाणात ग्रामपंचायत कार्यालय संगमवाडी येथे वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी उपस्थित सरपंच चक्रधर घुगे, उपसरपंच कोंडीबा करेवाड, माजी सरपंच नामदेव केंद्रे, माजी उपसरपंच रामु गोटमवाड, ग्रा.प.सदस्य भानुदास घुगे, पत्रकार माधव गोटमवाड, ग्रा.प.सेवक गोपीनाथ केंद्रे, उद्धव बालाजी घुगे, बळीराम जक्कलवाड, अंगणवाडीताई कलिंदा तिडके, सेविका सुरेखा केंद्रे यांच्यासह गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---


**CHANGE IN NAME**

My old name **Saleemuddin** which now I am changing as New Name **Saleemuddin Ahmed Bashiruddin Ahmed.** Hence forth my all correspondance will be done as per my New Name. Please consider the same.

**Address**
**Saleemuddin Ahmed Bashiruddin Ahmed**
**H.No. 8-1-66, Mandhai, Nanded**
**Mob. No.: 9588406597**

**CHANGE IN NAME**

My old name is **MOHAMMED IDREES MOOSANI** Which Now I Am changing As New Name **MOHAMMED IDRIS MOOSANI** Henceforth My All Correspondence Will Be Done As Per My Name Please Consider The Same.

Address
**Mohammed Idris Mohammed Bhai Moosani**
H. No. 02/3-586 Nazeer Complex,
3rd Floor, Opp. Kareemabad Post Office,
Sai Nagar, Nanded-431604
**Mob. 7861801786**

**CHANGE IN NAME**

I AM **MOHAMMED HAROON MOHAMMED KHAJA** changing as my child Name from OLD NAME **RIMSHA FIRDOUS MOHAMMAD HAROON** hence forth my all correspondence will be done as per my child new name **RIMSHA FIRDOUS MOHAMMED HAROON** Please consider the same.

Sign by
**MOHAMMED HAROON MOHAMMED KHAJA**
H.NO 9-5-780 KHAN SHADI KHANA,
HGILAL NAGAR, DEGLOOR NAKA, NANDED,
MAHARASHTRA, PIN.431604
MOBILE NO.: 9130455735


## भूवैकुंठ पंढरी – पुष्प १५८ वे –

विठु माऊलीचा घेऊनी निरोप । परतु लागल्या कन्या सासुरास ।।
तीच वाट परी मन हे उदास । भरतीचा जोम नाही ओहोटीस ।।
चराचरी तुझे जाणोनि अस्तित्व । सावळ्या रूपासी जडले ममत्व ।।
वाटाड्या तूच रे दाखवावी वाट । माणसामाणसात व्हावी तुझी भेट ।।

**– आनंद**

**अर्थ :** यात्रा संपली भक्त पांगले सगळे संत विठु माऊलीचा निरोप घेऊन परतीच्या मार्गाला लागले. काल ज्या वाटेवर नाचत फुगड्या खेळत सारे भक्त उत्सव साजरा करत होते तीच वाट आज अचानक उदास वाटायला लागली. समुद्राला भरती येताना जो उन्माद जाणवतो तेच पाणि उतरताना संथ होऊन झरझर उतरते. तीच प्रचिती परतताना येते. सृष्टीच्या कणाकणात तुझे अस्तित्व आहे हे आम्ही जाणून आहोत तरीही भगवंता तुझ्या सावळ्या रूपावर आमचे ममत्व जडले आहे. देवा तूच आमचा कायमचा मार्गदर्शक आहेस तूच आमचे अज्ञान घालवून काय ती योग्य वाट दाखवावीस. प्रत्येक माणसातले तुझे अस्तित्व ठळकपणे जाणवावे. एवढीच माफक अपेक्षा आहे .

**– ह भ प आनंद महाराज काकडे,**
**बनसारोळा ८८०५५५०३१५**

---

# प्रवीण दादा गायकवाड यांच्यावर अक्कलकोट येथे भ्याड हल्ला

**दै.चालु वार्ता वृत्तसेवा**
**उदगीर – प्रतिनिधी**
**अविनाश देवकते**

## – उदगीरमध्ये संभाजी ब्रिगेडचा तीव्र निषेध



**लातूर (उदगीर) :** संभाजी ब्रिगेडचे ज्येष्ठ नेते प्रवीण दादा गायकवाड यांच्यावर अक्कलकोट येथे दिनांक १३ जुलै रोजी करण्यात आलेल्या भ्याड हल्ल्याचा उदगीर येथे १४ जुलै रोजी तीव्र शब्दांत निषेध करण्यात आला. लातूर जिल्हा व उदगीर तालुका संभाजी ब्रिगेडच्या पदाधिकाऱ्यांनी एकत्र येत उपविभागीय अधिकारी, उदगीर यांना निवेदन सादर केले. या निषेध सभेमध्ये वक्त्यांनी व्यक्त केले की, शिव, शाहू, फुले, आंबेडकर यांच्या विचारांचा प्रसार करणाऱ्या, सामाजिक परिवर्तनाच्या चळवळीत कार्यरत असलेल्या प्रवीण दादा गायकवाड यांच्यावर झालेला हा हल्ला केवळ एका व्यक्तीवर नव्हे, तर विचारधारेवर आणि प्रगतीशील समाजरचनेवर आहे.

हल्ल्यात प्रवीण दादांवर साई फेकण्याचा प्रयत्न व काळं वंगण फासण्यात आले, ही बाब माणुसकीला काळीमा फासणारी असून अत्यंत निषेधार्ह आहे, असे स्पष्ट मत पदाधिकाऱ्यांनी मांडले.

**संभाजी ब्रिगेडचा इशारा**
**– हल्लेखोरांना अटक झाली नाही तर आंदोलन**

संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष शिवश्री राजकुमार माने यांनी प्रशासनास ठणकावून सांगितले की,

'प्रवीण दादा गायकवाड यांच्यावर हल्ला करणाऱ्यांना तात्काळ अटक करून कठोर कारवाई करावी, अन्यथा संभाजी ब्रिगेडच्या स्टाईलने संपूर्ण महाराष्ट्रभर तीव्र आंदोलन छेडले जाईल.'

विधानसभा अध्यक्ष शिवश्री उत्तमरावजी फड यांनीही आपल्या भाषणात नमूद केले की, 'शिव, शाहू, फुले, आंबेडकर यांचे विचारच देशात शांतता, एकता व अखंडतेचा आधार आहेत. पण हे विचार दिशाभूल करण्याचे षड्यंत्र सध्या रचले जात आहे. हे थांबवण्यासाठी विचारांनी सज्ज समाज उभा करण्याची गरज आहे.'

प्रशासनाने ब्रिगेडच्या कार्यकर्त्यांना, नेत्यांना आणि पदाधिकाऱ्यांना योग्य संरक्षण द्यावे अशी मागणीही यावेळी करण्यात आली.

**निवेदन सादर, पदाधिकाऱ्यांची ठाम भूमिका**

संभाजी ब्रिगेडकडून उपविभागीय अधिकारी, उदगीर यांच्याकडे देण्यात आलेल्या निवेदनात खालील मागण्या मांडण्यात आल्या:

* प्रवीण दादा गायकवाड यांच्यावर हल्ला करणाऱ्यांवर त्वरित गुन्हा दाखल करून अटक करण्यात यावी.
* हल्ला करणाऱ्यांना कठोर शिक्षा देण्यात यावी.
* सामाजिक नेतृत्व करणाऱ्या व्यक्तींना पोलीस संरक्षण द्यावे.
* सामाजिक विचारवंतांवर होत असलेल्या अशा प्रकारच्या हल्ल्यांना आळा बसवण्यासाठी कायदेशीर यंत्रणा सजग ठेवावी.

या निषेध सभेला व निवेदन प्रसंगी संभाजी ब्रिगेडचे पुढील पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

शिवश्री राजकुमार माने (जिल्हाध्यक्ष), शिवश्री उत्तमराव फड (विधानसभा अध्यक्ष), शिवश्री मोहनेश्वर विश्वकर्मा (जिल्हा सचिव), शिवश्री व्यंकटजी थोरे (जिल्हा सहसचिव), शिवश्री मेहबूब सय्यद (जिल्हा संघटक), शिवश्री राजकुमार भालेराव (तालुका अध्यक्ष), शिवश्री शिवा पाटील (शहराध्यक्ष), शिवश्री निजामुद्दीन (व्यापारी आघाडी शहराध्यक्ष), शिवश्री सुरज आटोळकर, शिवश्री सावन तोरणेकर, शिवश्री बाबासाहेब एकुरकेकर, शिवश्री नरसिंग बनशेळकीकर, शिवश्री धम्म सागर, शिवश्री कृष्ण बिरादार, शिवश्री रामेश्वर बिरादार, शिवश्री श्रीकृष्णा बिरादार, शिवश्री प्रसाद बिरादार, शिवश्री महारुद्र, शिवश्री राम रावणगावे.

---

# सुरेश दवणे यांची शालेय व्यवस्थापण समिती अध्यक्षपदी निवड

**दै.चालु वार्ता वृत्तसेवा**
**जालना – प्रतिनिधी**
**आकाश माने**



**जालना (मंठा) :** जिल्हा परिषद प्राथमिक शाळा केहाळ वडगाव शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्षपदी सुरेश दवणे व उपाध्यक्षपदी ओंकार नाईक यांची सर्वानुमते निवड करण्यात आली आहे. जिल्हा परिषद प्राथमिक शाळा केहाळ वडगाव येथील शालेय व्यवस्थापन समितीचा कार्यकालाची मुदत संपली असल्याने २०२५ ते २०२७ या दोन वर्षाच्या कालावधीसाठी नवीन शालेय व्यवस्थापन समिती सदस्यांची निवड करून समिती नव्याने गठीत करण्यात आली आहे. यासाठी पालकांची सर्वसाधारण सभा आयोजित करण्यात आली होती. केहाळ वडगाव येथील शालेय व्यवस्थापन समिती या सभेत गठन करण्यात आली. समितीच्या अध्यक्षपदी सुरेश ज्ञानेश्वर दवणे उपाध्यक्षपदी ओंकार प्रदिपराव नाईकयांची निवड करण्यात आली आहे. समितीच्या सदस्यपदी सौ.नीता विजय दवणे, सौ.कमल फकीरा साळवे, सौ.लता गजानन नाईक. सौ.कौशल्या रामचंद्र शिंदे, श्री दीपक डीगांमबरराव दवणे. श्री.संतोष शिवाजी दवणे. सौ शिंदू भागवत दवणे, सौ.चंदा सुदर्शन दवणे, शिक्षण प्रेमी सोहम प्रल्हाद दवणे, चिरंजीव हर्षल सिद्धेश्वर दवणे, कुमारी ईश्वरी भरत दवणे, शिक्षक प्रतिनिधी भुसकुटे डी.डी., सचिव पदी शाळेचे मुख्याध्यापक, एस. एन.चरकेवाड हे पदसिद्ध सचिव म्हणून निवड करण्यात आली मुख्याध्यापक यावेळी नूतन अध्यक्ष उपाध्यक्ष व सदस्यांचा सत्कार करण्यात आला यावेळेस विविध वर्गातील विद्यार्थ्यांचे पालक तथा शिक्षण प्रेमी तुकाराम दवणे, राजेभाऊ नाईक,विजय दवणे, अशोक दवणे, सिद्धेश्वर दवणे पांडुरंग दवणे ओंकार दवणे, वसंत हरबक, कृष्णा गडदे, अशोक दवणे (गुरु) सतीश दवणे, गजानन नाईक, भरत दवणे, विठ्ठल दवणे,पवन नाईक, धनंजय दवणे यांची उपस्थिती होती, सूत्रसंचालन डी. डी. भुस्कुटे यांनी केले मुख्याध्यापक एस. एन. चरकेवाड यांनी मार्गदर्शक केले आभार प्रदर्शन श्री कांबळे सर यांनी केले.

---

# समस्त बौद्ध समाज प्रयाग चिखली कोल्हापूर

**दै.चालु वार्ता वृत्तसेवा**
**कोल्हापूर – प्रतिनिधी**
**पंडित चौगुले**



**कोल्हापूर :** कोल्हापूर जिल्ह्यातील करवीर तालुका (सांगरूळ मतदारसंघ) येथील मौजे प्रयाग चिखली या गावी दलित वस्ती सुधारण्यासाठी निधी मिळाला आहे. त्या निधीमधून समाज मंदिर बांधण्याचे काम सुरूआहे. पण जी सदरची जागा ही सार्वजनिक श्री विठ्ठल मंदिर व्यवस्थापक शंकर कांबळे यांच्या मालकीची आहे सदर बांधकाम हे सार्वजनिक श्री विठ्ठल मंदिराची इमारत पाडून त्या जागेवर समाज मंदिर बांधकाम सुरू असून या ठिकाणी सर्वच प्रकारचे धार्मिक कार्यक्रम होतात शासनाच्या नियमाप्रमाणे कोणत्याही धार्मिक स्थळावर शासकीय निधी खर्च करता येत नाही असे असताना सदर जागेचे व्यवस्थापक मंडप धारक व त्यांचे वारस यांना कोणत्याही प्रकारची सूचना न देता शासनाने परस्पर बांधकाम सुरू केले आहे सदरचे चालू असलेले बेकायदेशीर बांधकाम तात्काळ थांबून शासनाची व्यवस्थापक व मंडप धारक यांची फसवणूक केली असल्याने संबंधित अधिकारी यांची ताबडतोब चौकशी करून त्यांच्यावर विना विलंब योग्य ती कारवाई करावी अन्यथा आम्हाला नाविलाजास्तव आपल्या विरोधात स्वातंर्त्य दिली दिनांक १५ ऑगस्ट २०२५ रोजी समस्त बौद्ध समाजा वतीने लोकशाही पद्धतीने आमरण साखळी उपोषण करण्यात येईल याची सर्वस्व जबाबदारी शासनावर राहील अशी नोंद घ्यावी. निवेदन देतेवेळी माननीय उपजिल्हाधिकारी यांनी कार्यकर्त्यांना कारवाई व चौकशीसाठी पुढे पाठवून योग्य तो निर्णय होईल अशी ग्वाही दिली यावेळी समाजातील बौद्ध अनुयायी उपस्थित होते. अनिल कुरणे,विठ्ठल कांबळे, रंगराव कामत, आर के पेंटर, सुनील कांबळे ,विकास कांबळे , विशाल कांबळे, कुंडलिक कांबळे, रोहित कांबळे, दादासो कांबळे, ऋषिकेश कांबळे, प्रवीण कांबळे,रघुनाथ कांबळे, सागर कांबळे,रणजीत कांबळे, लक्ष्मण कांबळे ,भानुदास कांबळे, असे मोठ्या संख्येने बौद्ध समाज उपस्थित होता.


This Daily Printed, Published and Owned by **Dnyanoba Sudhakar Lokhande Patil** Printed at Girish Printers and Paper Converters, 150, Shaniwar Peth, Near Amruteshwar Mandir, Pune (M.S.)-411030 and Published at Flat No.806, 8 th Floor, Ratan Neptune, Handewadi Road, Hadapsar, Pune (M.S.)-411028 ■ **Editor : Dnyanoba Sudhakar Lokhande Patil** ■ Mob No.: **9373504748** ■ Email **dainikchaluwartha@gmail.com** ■ RNI No.: MAHMAR/2021/82895 (JURISDICTION AT PUNE)


हे वृत्तपत्र मालक, मुद्रक, प्रकाशक **श्री.ज्ञानोबा सुधाकर लोखंडे पाटील** यांनी गिरीष प्रिंटर्स अँड कन्व्हर्टर्स, १५०, शनिवार पेठ, अमृतेश्वर मंदिराजवळ, पुणे (महाराष्ट्र)– ४११०३० येथे छापून फ्लॅट नं.८०६, ८ वा मजला, रतन नेपच्युन, हंडेवाडी रोड, हडपसर, पुणे (महाराष्ट्र)–४११०२८ येथून प्रकाशित केले. ■ **संपादक – श्री.ज्ञानोबा सुधाकर लोखंडे पाटील** ■ मो.नं.**9373504748** ■ Email - **dainikchaluwartha@gmail.com** ■ RNI No.: MAHMAR/2021/82895 (सर्व वाद पुणे न्याय कक्षेत)

# शिवरायांचे दुर्ग आता जागतिक वारसा!

## महाराष्ट्राची ऐतिहासिक झळाळी

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
ठाणे ग्रामीण - प्रतिनिधी
विकी जाधव





**ठाणे :** महाराष्ट्र हा केवळ सह्याद्रीच्या कड्याकपारींनी नटलेला प्रदेश नाही, तर तो इतिहासाचा, पराक्रमाचा आणि स्वराज्याच्या महान संकल्पनेचा साक्षीदार आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या पदस्पर्शाने पावन झालेली गड-किल्ल्यांची शृंखला आजही त्यांच्या शौर्याच्या कथा सांगत उभी आहे. अशा १२ ऐतिहासिक किल्ल्यांना युनेस्को या जागतिक संस्थेच्या जागतिक वारसा स्थळ मानांकनाची शिफारस झाल्याने महाराष्ट्राच्या गौरवात भर पडली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व मंत्रिमंडळातील सर्व सदस्यांनी या निर्णयाचे स्वागत केले आहे. सोबतच सामान्य जनतेने देखील गड-किल्ल्यांवर जाऊन आपला आनंद व्यक्त केला. आपला इतिहास प्रत्येकाला माहिती असणे आवश्यक असतेच. या शिवाय इतिहासातून लढण्याची प्रेरणा मिळते. भविष्याची रणनीती ठरवण्याची दिशा मिळते. येणाऱ्या पिढ्यांना आपल्या पूर्वजांसह जुनी संस्कृती अभ्यासाता येते. त्यामुळे ऐतिहासिक दुर्ग आपले कायम प्रेरणास्त्रोत आहेत. विशेषतः छत्रपती शिवाजी महाराज यांच्या काळात निर्माण झालेले हे दुर्ग महाराष्ट्राच्या सर्वसामान्यांच्या नेतृत्वाच्या दूरदृष्टीची साक्ष देणारे ठरते. सोबतच अल्प आयुष्यात सुद्धा जबरदस्त इच्छाशक्ती असेल तर तुम्ही भीम पराक्रम जगापुढे ठेवू शकता. हजारो वर्ष येणाऱ्या पिढ्यांना मार्गदर्शन करू शकता असा वस्तूपाठ छत्रपती शिवरायांच्या या १२ किल्ल्यांनी महाराष्ट्राला, देशाला दिला होता. आता हा दूरदृष्टीचा वारसा यानिमित्ताने जागतिक झाला आहे. युनेस्को ; कार्य आणि भूमिकायुनेस्को (United Nations Educational, Scientific and Cultural Organization) या संस्थेची स्थापना १६ नोव्हेंबर १९४५ रोजी पॅरिस (फ्रान्स) येथे झाली. दुसऱ्या महायुद्धानंतर जागतिक शिक्षण, विज्ञान आणि संस्कृतीच्या माध्यमातून शांतता व सहकार्य वाढविण्याच्या उद्देशाने ही संस्था स्थापन झाली. युनेस्कोचा उद्देश म्हणजे जगातील सांस्कृतिक आणि नैसर्गिक दृष्ट्या महत्त्वाच्या स्थळांचे जतन करणे, जपणे आणि जागतिक समुदायात त्यांची ओळख निर्माण करणे. यासाठी 'World Heritage Convention, १९७२' तयार करण्यात आले. भारताने १९७७ साली युनेस्कोच्या जागतिक वारसा करारावर स्वाक्षरी केली. तेव्हापासून अनेक स्थळांना या यादीत मान्यता मिळाली आहे. सध्या भारतात जवळपास ४२ जागतिक वारसा स्थळे आहेत (२७ सांस्कृतिक, ७ नैसर्गिक, १ मिश्र स्वरूपाची व इतर प्रस्तावित). यामध्ये राजस्थानच्या गडकिल्ल्यांचाही सहभाग होता. महाराष्ट्राचे गड किल्ले मात्र दुर्लक्षित होते. यानिमित्ताने त्याकडे जागतिक लक्ष वेधले गेले आहे. भारतातील स्थळांची शिफारस केंद्र सरकार अंतर्गत भारतीय पुरातत्व विभाग करतो. राज्य सरकार, स्थानिक संस्था आणि तज्ज्ञांच्या मदतीने केंद्र सरकार युनेस्कोला प्रस्ताव सादर करते. पराक्रमाच्या १२ यशोगाथा महाराष्ट्रातील ११ किल्ले आणि तामिळनाडूमधील जिंजी किल्ला अशा एकूण १२ किल्ल्यांना युनेस्को जागतिक वारसा यादीत समाविष्ट करण्यासाठी नामनिर्देशन देण्यात आले आहे. हे सर्व किल्ले छत्रपती शिवाजी महाराजांच्या पराक्रमाचे जिवंत प्रतीक आहेत. स्वराज्याच्या राजधानीचा किल्ला रायगड, शिवाजी महाराजांचा सर्वात प्रिय किल्ला राजगड, अफझलखानाचा वध ज्या ठिकाणी झाला तो प्रतापगड, महाराजांच्या पराक्रमाचा साक्षीदार पन्हाळा, महाराजांचे जन्मस्थान शिवनेरी, भक्कम डोंगररांगेवर वसलेला आणि लष्करी दृष्टिकोनातून महत्त्वाचा लोहगड, मराठ्यांनी पहिला मोठा विजय मिळवलेला किल्ला साल्हेर, सागरी संरक्षणासाठी बांधलेला दुर्ग सिंधुदुर्ग, सागरी दळणवळणासाठी अत्यंत महत्त्वाचा सुवर्णदुर्ग, सागरी लढायांचे केंद्र विजयदुर्ग आणि मुंबई किनाऱ्याजवळील सागरी संरक्षणकवच असलेला खांदेरी किल्ला. तर तामिळनाडू राज्यातील दक्षिणेकडील रणभूमीवर मराठ्यांनी ताबा मिळवलेला जिंजी किल्ल्याचा यात समावेश आहे. तत्कालिन युद्धनीतीचे शिलालेख महाराष्ट्रातील हे बारा किल्ले आपल्या शेकडो युद्धनीतीच्या प्रात्यक्षिकांसह उभे आहेत. हे वास्तुकलेचे प्रत्यक्ष दर्शन असले तरी जगाला आपल्या दगडांच्या कवितेतून तत्कालीन युद्धनीतीला सांगणारे उत्तम प्रतीचे जणू शिलालेख ही आहे. थोडक्यात, प्रत्येक किल्ल्याकडे आपली एक गाथा आहे. जगाला नवल वाटेल अशी रोचक प्रत्येकाची कथा आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील हे किल्ले राजकीय, लष्करी आणि सांस्कृतिक दृष्टिकोनातून अनमोल आहेत. प्रत्येक किल्ल्याचे वैशिष्ट्य स्वयंपूर्ण असून जागतिक पर्यटकांना देखील तत्कालीन युद्धनीतीची माहिती देणारे आहे. सह्याद्रीच्या कठीण डोंगररांगांवर आणि किनाऱ्यावर ही किल्ले बांधण्यात आली, ज्यामुळे शत्रुपासून संरक्षण अधिक प्रभावी झाले. मराठा स्थापत्यकलेतील माची एक वैशिष्ट्य - किल्ल्याच्या टोकाला किंवा बाहेरील भागात असलेले बुरुजयुक्त संरक्षण. अशा माच्या जगातील इतर कुठल्याही किल्ल्यांमध्ये दिसत नाहीत.शत्रूला सहज लक्षात न येणारे वळणदार, सुरक्षित दरवाजे ही एक विलक्षण प्रवेशद्वारांची रचना आहे. गनिमी कावा अर्थात गुरीला युद्ध नीती मध्ये अशी रचना किती आवश्यक असते याचेही महत्त्व या रचनेवरून कळते. हे किल्ले केवळ लढायांचे ठिकाण नव्हते, तर स्वराज्य संकल्पनेचा प्रचार करणारी केंद्रेही होती. युनेस्को अद्वितीय वैश्विक मूल्य या निकषावर आधारित स्थळांची निवड करते. यामध्ये ऐतिहासिक महत्त्व आणि वैभवशाली परंपरा, स्थापत्यशास्त्रातील वैशिष्ट्यपूर्ण रचना, जगात अन्यत्र न आढळणारा अद्वितीय स्वरूप, मानवतेच्या सांस्कृतिक आणि सामाजिक इतिहासाशी असलेली नाळ, संरक्षणाची अवस्था आणि व्यवस्थापन हे पाच गुणधर्म पाहिले जातात. या निकषांवर महाराष्ट्रातील किल्ले पूर्ण उतरतात, म्हणूनच यांना जागतिक वारसा स्थळाचा दर्जा देण्यासाठी युनेस्कोच्या यादीत समावेश झाला आहे. शिवरायांचा प्रताप जगव्यापीया मान्यतेमुळे छत्रपती शिवाजी महाराजांचे कार्य जगासमोर अधिक प्रभावीपणे मांडता येईल. त्यांच्या युद्धनीतीचा जागतिक स्तरावरील युद्धांच्या युद्धनीती सोबत अभ्यास होईल. जगाच्या पटलावर एका महान योद्धाच्या पराक्रमाचे चिंतन, मंथन होईल. हे फक्त महाराष्ट्राच्याच नाही तर भारताच्या सन्मानाचे लक्षण आहे. जागतिक पर्यटक देखील या ठिकाणी आकर्षित होतील, ऐतिहासिक पर्यटनाला चालना मिळेल आणि स्थानिक अर्थव्यवस्थेलाही उभारी मिळेल. १२ पराक्रम स्थळांचे युनेस्कोच्या व्यासपीठावर आगमन होणे ही महाराष्ट्रासाठी ऐतिहासिक आणि अभिमानाची घटना आहे. हे फक्त वास्तुकलांचे प्रतिनिधी नसून, स्वातंत्र्याची, धैर्याची आणि एकीची अमूल्य प्रतीके आहेत. यामुळे शिवरायांचे विचार, त्यांचे शौर्य आणि त्यांची दूरदृष्टी नव्या पिढीपर्यंत पोहोचेल, आणि जगातील इतिहासात भारताचे स्वाभिमानी पान अधिक उजळून निघेल.

**- प्रवीण टाके, उपसंचालक (माहिती), विभागीय माहिती कार्यालय, कोल्हापूर**

# उदगीर इनरव्हील क्लबचा पदग्रहण सोहळा उत्साहात पार पडला

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
उदगीर - प्रतिनिधी
अविनाश देवकते



## अनुराधा चांडक यांच्या प्रमुख उपस्थितीत नूतन कार्यकारिणीने स्वीकारला पदभार

**लातूर (उदगीर) :** उदगीर इनरव्हील क्लबचा २०२५-२६ या वर्षासाठीचा पदग्रहण सोहळा दिनांक १३ जुलै रोजी शिवानंदा फंक्शन हॉल येथे अत्यंत उत्साही वातावरणात पार पडला. या कार्यक्रमास मा. अनुराधा चांडक (PSA, PDC) प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या.

कार्यक्रमात नव्याने कार्यभार स्वीकारलेल्या कार्यकारिणी सदस्यांमध्ये

अध्यक्ष पल्लवी मुक्कावार, उपाध्यक्ष अलका येरोळकर, सचिव योजना चौधरी, सहसचिव प्रिया नारखेडे, कोषाध्यक्ष स्वाती गुरुडे, खडज रोहिणी चाटे, एडिटर अश्विनी देशमुख, क्लब उउ मीरा चंबुळे या सर्वांनी सन्मानपूर्वक पदग्रहण करून आपल्या जबाबदाऱ्या स्वीकारल्या.

माजी अध्यक्ष सौ. मानसी चन्नावार यांच्या कार्यकाळात उत्कृष्ट प्रकल्प राबवून क्लबला मोलाचे योगदान देणाऱ्या सदस्यांचा या कार्यक्रमात सत्कार करण्यात आला. इको ब्रिक्स बनवणे, मिटींगमध्ये सातत्यपूर्ण उपस्थिती ठेवणे, तसेच विविध सामाजिक उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेतल्याबद्दल अनेक सदस्यांना विशेष पुरस्काराने गौरविण्यात आले. प्रमुख पाहुण्या अनुराधा चांडक यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात महिलांनी आपल्या वेळेचे योग्य नियोजन करून कुटुंब, व्यवसाय किंवा नोकरी सांभाळतानाच सामाजिक क्षेत्रात कार्यरत राहण्याचे महत्त्व पटवून दिले. 'इनरव्हीलसारख्या संस्थांद्वारे महिलांनी समाजात नेतृत्वाच्या संधी घ्याव्यात,' असे त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमात राबविण्यात आले महत्वाचे सामाजिक उपक्रम -

१. कृषी दिन (१ जुलै) निमित्ताने गरजू महिलांना फवारणी यंत्र व ताटपत्री वाटप.

२. सुवर्णमाता विद्यालयातील १२ मुलींना योगा ड्रेस वाटप - प्रोजेक्ट प्रमुख सौ. दिपा आंबेसंगे.

३. इनरव्हील ब्रँडिंग बोर्डचे उद्घाटन मा. अनुराधाजी चांडक यांच्या हस्ते करण्यात आले.

या यशस्वी सोहळ्याकरिता इनरव्हील क्लबच्या सर्व कार्यकारिणी सदस्य व सदस्यांनी उत्कृष्ट संयोजन व सहकार्य केले.

# वाहतूक कोंडीच्या समस्येवर तोडगा काढावा

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
ठाणे - प्रतिनिधी
वैभव शेटे

**ठाणे :** एकनाथजी शिंदे (उप मुख्यमंत्री महाराष्ट्र), स्थानिक आमदार प्रतापजी सरनाईक (परिवहन मंत्री महाराष्ट्र), खासदार नरेशजी म्हस्के यांच्या मार्गदर्शनाखाली वर्तकनगर मध्ये पुढे उद्भवणाऱ्या वाहतूक कोंडीच्या समस्येवर तोडगा काढण्यासाठी ओवळा माजिवडा शहरप्रमुख राजेंद्र फाटकसाहेब व स्थानिक नगरसेविका सौ.राधिका फाटक यांच्या वतीने ठाणे महानगरपालिका आयुक्त सौरव राव यांना निवेदन देण्यात आले असे की ओवळा माजिवडा विधानसभा क्षेत्रातील प्रभाग क्र.७ मध्ये म्हाडा कॉलनी मध्ये एकूण ६९ इमारती असून त्यातील बहुतेक जुन्या ग्राउंड + ३ मजली इमारतींच्या जागी ३५ मजली टॉवरच्या स्वरूपात पुनर्विकास कामे जोरात चालू आहेत. आतापर्यंत पुनर्विकासित इमारतींमधील ७ ते ८ टॉवरचा ताबा देण्यात आला आहे त्यातच पार्किंगच्या समस्या येण्यास सुरुवात झाली आहे. सदर टॉवर मधील विकासकाने दिलेल्या अपुऱ्या पार्किंगमुळे इमारतींच्या वाहनधारकांना रस्त्याच्या दोन्ही बाजूला पार्किंग करावी लागत आहे .यामुळे रस्त्याच्यामधून एखादी गाडी नेण्यासह ही अडचण निर्माण होऊ लागली आहे.

भविष्यात पुढील इमारतींचा पुनर्विकास झाल्यानंतर लोकांना आपल्या घरापासून १ ते २ किलोमीटर अंतरावर आपल्या गाड्या पार्क करून घरी जावे लागणार आहे ह्या समस्या उद्भवण्या अगोदरच यावर तोडगाय काढणे आवश्यक आहे.

ठाणे महानगरपालिकेच्या शहर विकास विभागाला पुनर्विकास करणाऱ्या विकासकाला इमारत बांधण्याची परवानगी देतानाच एका रूम मागे २ ते ३ पार्किंगची तरतूद असावी तरच विकासकाला बांधकामाची परवानगी देण्यात यावी.तसेच यावर पर्यायी तोडगा म्हणजे वर्तकनगर आराखडा मध्ये एखादा भूखंड खाली असेल तेथे ८०० ते १००० गाड्या सामावतील असा पार्किंग प्लाझा (इमारत) बांधण्यात यावा अशी स्थानिक नागरिकांकडून स्थानिक नगरसेविका सौ.राधिका राजेंद्र फाटक व शहरप्रमुख राजेंद्र फाटक साहेब यांच्याकडे मागणी केली आहे. सदर निवेदन स्वीकारून आयुक्त सौरव राव यांनी सकारात्मक प्रतिसाद देऊन समस्येचा गांभीर्याने विचार करून त्यावर योग्य तोडगा काढण्याचे आश्वासन दिले.

# प्रवीणदादा गायकवाड हल्ल्याचा निषेध

## देगलूरमध्ये मराठा समाज आक्रमक



दै.चालु वार्ता वृत्तसेवा
देगलूर - प्रतिनिधी
एकनाथ गाडीवान

**संबंधितावर तातडीने कठोर शिक्षा झालीच पाहिजे हा हल्ला लोकशाही अभिव्यक्ती स्वातंत्र्य व संविधानित मूल्यांवर असल्याचे स्पष्ट केले.**

**देगलूर :** अक्कलकोट (जि. सोलापूर) येथे संभाजी ब्रिगेडचे प्रदेशाध्यक्ष प्रवीणदादा गायकवाड यांच्यावर दिनांक १३ जुलै २०२५ रोजी झालेल्या जीवघेण्या हल्ल्याच्या निषेधार्थ देगलूर तालुक्यातील सकल मराठा समाज आक्रमक झाला असून, त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना संबोधित निवेदन उपजिल्हाधिकारीमार्फत सादर केले आहे. या निवेदनात म्हटले आहे की, हा हल्ला केवळ एका व्यक्तीवर नव्हे, तर संपूर्ण विचारप्रवाहावर व राज्यातील कायदा-सुव्यवस्थेवर घातलेला आघात आहे. समाजकंटक आणि जातीय तेढ पसरवणाऱ्या प्रवृत्तींनी हा हल्ला अतिरेकी पद्धतीने शाही फेकून व इतर हिंसक माध्यमांतून केला आहे.

प्रवीणदादा गायकवाड हे उच्च विद्याविभूषित व वैचारिक क्षेत्रातील अभ्यासू व्यक्ती असून त्यांनी हजारो तरुणांना वैचारिक मार्गदर्शनासोबतच उद्योजक बनवले आहे. त्यांच्यावर झालेला हल्ला नियोजनबद्ध असून त्यामागे जातीय तेढ पसरविण्याचा कट असल्याचे सकल मराठा समाजाने निवेदनात म्हटले आहे.

सदर प्रकरणात दोषींवर कठोर कायदेशीर कारवाई व्हावी, त्यांच्यावर भारतीय दंड विधानासोबतच आतंकवाद विरोधी कायदा (UAPA) आणि द्वेष पसरविणाऱ्या कायद्यांतर्गतही गुन्हे दाखल व्हावेत, अशी मागणी करण्यात आली आहे.

याशिवाय, प्रवीणदादा गायकवाड यांना शासनस्तरीय सुरक्षा कवच उपलब्ध करून द्यावे, अशा घटना टाळण्यासाठी तपास यंत्रणा व प्रतिबंधात्मक उपाययोजना आखाव्यात, अशी ठाम भूमिका या निवेदनातून मांडण्यात आली आहे.

शेवटी, ही घटना लोकशाही, अभिव्यक्ती स्वातंत्र्य व संविधानिक मूल्यांवर हल्ला असल्याचे स्पष्ट करत, आरोपी दीपक काटे व त्याच्या सहकाऱ्यांवर कठोर कारवाई करून लोकांचा विश्वास प्रस्थापित करावा, अशी अपेक्षा सकल मराठा समाज देगलूर तालुक्याने व्यक्त केली आहे. व तसेच देगलूर तालुक्यातील सर्व सकल मराठा समाज बांधव व सामाजिक चळवळीतील सर्व कार्यकर्ते उपस्थित होते.

# मोबाईलची जीवघेणी 'नशा'! जेवढा फायद्याचा तेवढेच धोके अधिक

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
वाघोली - प्रतिनिधी
स्वरुप गिरमकर



**(पुणे) वाघोली :** मोबाईल... सध्या वापरात असलेली सर्वात महत्त्वाची वस्तू. प्रत्येकाच्या हातात मोबाईल हा दिसणारच त्याचा वापर अनेक गोष्टी सुलभ व्हाव्यात यासाठी केला जातो. मात्र, सध्या सुरु असलेल्या प्रकारानंतर असे समोर येत आहे की, कामाचा वेळ वाचवणारी आणि फायद्याची वस्तू आता अनेकांसाठी जीवघेणी होत आहे.

**अतिवापराचे दुष्परिणाम**

मोबाईल हा संपर्क साधण्यासह इतर माहिती मिळविण्यासाठी जसा उपयुक्त आहे. तसेच त्याच्या अतिवापरामुळे होणारे दुष्परिणामही अधिक आहेत. काहींना मोबाईलचे अक्षरशः व्यसन लागले आहे. मोबाईलची ही नशा काहींच्या तर जिवावर बेतत असल्याचे दिसून येते.

**नाते संबंधांमध्ये तिढा!**

मोबाईलमुळे नात्यांमध्ये संशय निर्माण होत आहेत. हट्टीपणा, राग, गैरसमज वाढत आहेत. त्यामुळे टोकाचे निर्णय, मारामारी, घटस्फोट, खून असे धक्कादायक प्रकार समोर येत आहेत. मानवाला प्रगतीसाठी मोबाईल उपयुक्त आहे तितकाच त्याच्या विनाशालाही कारणीभूत ठरत आहे. पूर्वी मित्र, शाळा, क्लासेस, मैदानी खेळ, स्पर्धा, यामध्ये मुलांचा वेळ जात होता. मात्र, आता मुले मोबाईल स्क्रीनच्या अत्यंत जवळ गेली आहेत. यामुळे प्रत्यक्ष माणसांशी ते दूर होत आहेत.

**मोबाईलचे फायदे**

- जगाच्या कोणत्याही कोपऱ्यात असलेल्या व्यक्तीशी संवाद साधण्याचा आनंद
- अनेक कामे घरी बसून केल्याने वेळ, पैसा वाचतो
- अडचणीच्या काळात रस्ता दाखवणे
- अभ्यास करणे, नोट्स मिळवणे, चर्चासत्र भरवणे
- मनोरंजन

**मोबाईलचे परिणाम**

१. मोबाईलच्या अतिवापरामुळे मानसिक स्थैर्य हरवत चालले आहे. मन शांत होत नाही, त्यामुळे एकाग्रता नाहीशी होतेय.

२. मुलांमध्येही आत्मसंयमाचा अभाव, जिज्ञासेचा अभाव

३. चिडचिडेपणा, रागाच्या प्रमाणात वाढ

४. भावनात्मकदृष्ट्या मुले अस्थिर, मुले मोबाईलकडे अधिक आकर्षित होत असून त्यांच्या समस्या

५. मानसिक, भावनिक समस्याबरोबर शारीरिक समस्या, अनेक आजारांना निमंत्रण

**उपाय**

१. स्वतःला मर्यादेत बांधा, मोबाईलचा वापर ठराविक काळ व वेळ यातच करण्याचा प्रयत्न करा

२. घरी आल्यावर सर्वांचे मोबाईल ठराविक जागेत ठेवा आणि ते तेथूनच वापरात आणा यामुळे विश्वासार्हता वाढेल

३. मनमोकळेपणाने एकमेकांशी बोला

४. नात्यात पारदर्शकता असू द्या

**''जो मोबाईल प्रगतीसाठी आहे तो अनिष्ट घडवत आहे. ही बाब मानवाच्या प्रगतीला हानिकारक ठरत आहे. त्यामुळे मोबाईल वापरणाऱ्यांवरही मर्यादा असायला हव्यात. मुलांना मोबाईल दिल्यानंतर ते मोबाईलवर काय करतात याचीही चाचपणी व्हायला हवी. मोबाईल म्हणजेच सर्वकाही नाही, ही बाब प्रत्येकाने गांभीर्याने लक्षात घ्यायला हवी.''**

**- डॉ. पल्लवी मेहेरे,वाघोली, पुणे.**

**मुलांच्या हातात मोबाईल देण्याऐवजी त्यांना विविध मैदानी खेळात गुंतविले आवश्यक आहे. मुलांना खेळण्यासाठी मोबाईल दिल्यानंतर आपली जबाबदारी संपली, असा पालकांचा समज चुकीचा आहे. मुलांना मैदानी खेळ खेळण्यासाठी सतत प्रोत्साहित करा.**

**- बाळासाहेब पऱ्हाड, अध्यक्ष, शिरूर तालुका मित्र परिवार, चंदननगर, पुणे.**

# शेतकऱ्यांना पीएम किसान, नमो किसान व राशनचे पैसे तात्काळ द्या : नुमान चाऊस

## पालकमंत्री, खासदार व जिल्ह्यातील सर्व आमदारांची चाऊस घेणार भेट

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
कोल्हापूर - प्रतिनिधी
पंडित चौगुले



**माजलगांव :** महाराष्ट्रात सध्या खरीप पेरणी सुरू आहे. या काळात शेतकऱ्यांना पैशांची गरज असते. पेरणी झाल्यापासून महिना उलटला तरी आतापर्यंत पाऊस पडलेला नाही म्हणून अनेक शेतकऱ्यांवर दुबार पेरणीचे संकट आले आहे. दुबार पेरणीसाठी शेतकऱ्यांना पुन्हा आर्थिक तरतूद करावी लागत आहे. अगोदरच कर्जबाजारी झालेला शेतकरी पुन्हा ही तरतूद करण्यास असमर्थ आहे. म्हणून शासनाने विविध योजना अंतर्गत लाभार्थी शेतकऱ्यांना आर्थिक मदत त्यांच्या खात्यात तात्काळ पाठवावी. शेतकऱ्यांची आत्महत्या व त्यांची आर्थिक परिस्थिती बघता पीकविमा अर्जासाठी ठेवलेले शुल्क हे न परवडणारे आहे. म्हणून पीकविमा एक रुपयात भरण्याची योजना चालू ठेवावी यासह सर्व मागण्या मौलाना आझाद युवा मंचचे बीड जिल्हाध्यक्ष नुमान अली चाऊस यांनी केली आहे. ही परिस्थिती बघता राज्य सरकारने तात्काळ शेतकऱ्यांची सरसकट कर्जमाफी करावी नसता येणाऱ्या काळात मौलाना आझाद युवा मंचच्या वतीने जिल्हाभरात लोकशाही मार्गाने आंदोलने करण्यात येईल असे नुमान चाऊस यांनी प्रसिद्ध पत्रकाव्दारे कळविले आहे.

# प्रवीण दादा गायकवाड यांच्यावर झालेल्या भ्याड हल्याचा कंधार येथे संभाजी ब्रिगेडच्या वतीने तीव्र निषेध

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
कंधार - प्रतिनिधी
माधव गोटमवाड



**कंधार :** संभाजी ब्रिगेडचे ज्येष्ठ नेते प्रवीण दादा गायकवाड यांच्यावर अक्कलकोट येथे करण्यात आलेल्या भ्याड हल्ल्याचा कंधार येथे मराठा सेवा संघ संभाजी ब्रिगेड चे तालुका अध्यक्ष संदीप पाटील तोंडचिरे यांनी तीव्र शब्दांत निषेध केला. मराठा सेवा संघ संभाजी ब्रिगेडचे तालुका अध्यक्ष संदीप पाटील तोंडचिरे यांनी प्रशासनास ठणकावून सांगितले की,'प्रवीण दादा गायकवाड यांच्यावर हल्ला करणाऱ्यांना तात्काळ अटक करून कठोर कारवाई करावी, अन्यथा संभाजी ब्रिगेड संपूर्ण महाराष्ट्रभर तीव्र आंदोलन करेल.

कंधार तहसीलदारामार्फत मुख्यमंत्री व गृहमंत्री यांना बहुजन समाजातील व सकल मराठा समाजाच्या वतीने निवेदन सादर करून तत्काळ कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली.

प्रवीण दादा यांच्यावर हल्ला म्हणजे...

'समता, बंधुता, आणि वैचारिक आंदोलनावर हल्ला होय !'

हल्लेखोर दीपक काटे हा केवळ गुन्हेगार नसून, भाजपच्या एका शाखेचा प्रदेश सचिव असल्याची माहितीही निवेदनात नमूद करण्यात आली आहे. त्यामुळे फक्त पोलिस कारवाई नव्हे, तर त्याला पक्षातून हकालपट्टी करावी, अशी जोरदार मागणी संभाजी ब्रिगेडने केली.

प्रवीण दादा गायकवाड यांच्यावर झालेला हा हल्ला केवळ एका व्यक्तीवर नव्हे, तर विचारधारेवर आणि प्रगतीशील समाजरचनेवर झालेला हल्ला होय असे निवेदनात म्हटले आहे. या वेळी परमेश्वर जाधव शिवसेना तालुका अध्यक्ष,विष्णू पाटील जाधव शहर प्रमुख संभाजी ब्रिगेड कंधार, भगवान पा.गिरे, केशव पा.जाधव, देवानंद पा.मोरे, नामदेव पा. बोरोळे, बालाजी पा.मोरे,जाधव एस. एच, ज्ञानेश्वर तेलंग, झेंपलवाड मारोती यांच्यासह तालुक्यातील बहुजन समाजातील व सकल मराठा समाजाचे, संभाजी ब्रिगेड चे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आता वीज बिल भरा अन अतिरिक्त उत्पन्न मिळवा

## बेरोजगार, व्यावसायिक आणि बचत गटांसाठी सुवर्णसंधी

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
नागपूर - प्रतिनिधी
सतीश कडू

**नागपूर :** वीज बिल भरणा अधिक सुलभ करण्यासोबतच आता अतिरिक्त उत्पन्न मिळवण्याचीही संधी महावितरणने उपलब्ध करून दिली आहे. महावितरणने स्वतःचे अत्याधुनिक पेमेंट वॉलेट 'महापॉवरपे' सुरूकेले असून, यामुळे वीज ग्राहकांना बिल भरणे अधिक सोपे झाले आहे, तर १८ वर्षांवरील कोणताही व्यक्ती या वॉलेटचा वापर करून प्रति बिल पावतीमागे ५ रुपये कमिशन मिळवू शकतो. विशेषतः ग्रामीण भागातील नागरिकांसाठी ही एक उत्तम संधी असून, बेरोजगार तरुण, छोटे व्यावसायिक आणि बचत गटही या योजनेचा लाभ घेऊन आत्मनिर्भर होऊ शकतात.

असे व्हा महावितरणचे 'वॉलेटधारक' आणि मिळवा उत्पन्न: महावितरणचे वॉलेटधारक होण्यासाठी काही सोप्या अटी आहेत. १८ वर्षांवरील कोणतीही व्यक्ती आवश्यक कागदपत्रांसह अर्ज करू शकते. यात आधार कार्ड, पॅन कार्ड, गुमास्ता प्रमाणपत्र (व्यावसायिकांसाठी), पत्त्याचा पुरावा, पासपोर्ट फोटो, रद्द केलेला धनादेश, वीजेचे बिल आणि भाडेकरूंसाठी भाडे करारनामा यांसारख्या प्रतींसह महावितरणच्या उपविभागीय कार्यालयात अर्ज करणे आवश्यक आहे.

**ऑनलाइन नोंदणीचीही सोय :** तुम्ही www.mahadiscom.in या महावितरणच्या संकेतस्थळाला भेट देऊन आवश्यक कागदपत्रे अपलोड करून ऑनलाइन नोंदणी करू शकता. याशिवाय, महावितरणचे महा पॉवर पे ?प गुगल प्ले स्टोअरमधून डाउनलोड करू शकतात. यासाठी ॲपवर नोंदणिसाठी मदत देखील उपलब्ध आहे. ॲपमध्ये नोंदणी करून तुमचा मोबाईल नंबर आणि इतर आवश्यक माहिती भरा. अर्जदारांच्या अर्जाची आणि जागेची पडताळणी संबंधित उपविभागीय कार्यालयाकडून विनाशुल्क केली जाते. ही माहिती मुंबई कार्यालयाला पाठवल्यानंतर अर्जांना मंजुरी मिळते. एकदा ऑनलाइन नोंदणी झाल्यावर तुम्ही तब्बल ९९ ठिकाणी लॉग-इन करून वीज देयके स्वीकारू शकता. किंवा वॉलेटमधील शिल्लक रकमेतून तुम्ही तुमचे वीजबिल भरूशकता.

**वॉलेट रिचार्ज आणि कार्यप्रणाली :** महावितरणच्या मुख्य कार्यालयाकडून मंजुरी मिळाल्यानंतर तुम्हाला सुरुवातीला किमान ५ हजार रुपयांचे वॉलेट रिचार्ज करावे लागते. त्यानंतर एक हजार रुपयांच्या पटीत तुम्ही रिचार्ज करू शकता. डेबिट कार्ड, क्रेडिट कार्ड आणि ऑनलाइन बँकिंगद्वारे वॉलेट रिचार्ज करण्याची सोय उपलब्ध आहे.

वॉलेटधारक महावितरणच्या ॲपमध्ये नोंदणी करून ग्राहकांकडून वीज बिल स्वीकारू शकतात. बिल भरणा झाल्यानंतर संबंधित ग्राहकाच्या नोंदणीकृत मोबाईलवर तात्काळ एसएमएस मिळाल्याने ग्राहकांचे जागेवरच समाधान होते. एकाच वॉलेटचा बॅलेन्स वापरून विविध लॉग-इनद्वारे वेगवेगळ्या व्यक्तींकडून वीज बिल भरून घेण्याची सोयही या वॉलेटमध्ये देण्यात आली आहे.

**महावितरण वॉलेटचे फायदे :** ग्राहक त्यांच्या मोबाईल किंवा इतर उपकरणांच्या मदतीने कधीही आणि कुठेही वीजबिल भरू शकतात. छोटे व्यावसायिक, जसे की किराणा दुकानदार, मेडिकल स्टोअर्स, किंवा वीज बिल स्वीकारणारी एजन्सीज, वॉलेट वापरून वीजबिल भरून कमिशन मिळवू शकतात. ॲपमध्ये वीजबिल भरणा आणि इतर व्यवहारांची माहिती उपलब्ध असल्याने, वापरकर्त्यांना व्यवहारांमध्ये पारदर्शकता मिळते. ग्राहक ॲपमध्ये वीजबिल पाहू शकतात, तक्रारी नोंदवू शकतात आणि भरलेल्या बिलांचा इतिहास तपासू शकतात.

**कोणासाठी आहे ही संधी :** ही योजना कोणत्याही सज्ञान व्यक्तीसाठी, दुकानदारांसाठी, छोट्या-मोठ्या व्यावसायिकांसाठी, बचत गटांसाठी, तसेच वीज मीटर रिडींग आणि बिलवाटप एजन्सीसाठी एक उत्तम संधी आहे. प्रत्येक बिलामागे ५ रुपये कमिशन त्याच दिवशी तुमच्या वॉलेटमध्ये जमा केले जाईल. यामुळे तुमच्या नियमित उत्पन्नात भर पडणार आहे.

महावितरणचे 'महापॉवर्पे' हे पेमेंट वॉलेट हे केवळ बिल भरणा सुविधा नसून, ते एक अतिरिक्त उत्पन्न मिळवण्याचे प्रभावी माध्यम बनले आहे. या सुवर्णसंधीचा लाभ घेऊन स्वतःला आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याचे आवाहन मुख्य अभियंता दिलीप दोदके यांनी केले आहे.

# मल्हारगडवर अभ्यास, स्वच्छता मोहीम आणि आनंदोत्सव!

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
कोथरूड - प्रतिनिधी
राम कटरे



**कोथरूड :** युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत महाराष्ट्रातील ११ आणि तामिळनाडूतील जिंजी किल्ला यांचा समावेश होऊन एकूण १२ गड दुर्गांनी जागतिक गौरव प्राप्त केल्याच्या पार्श्वभूमीवर, श्री दुर्ग संवर्धन संस्थेच्या वतीने मल्हारगडावर अभ्यास, स्वच्छता मोहीम आणि आनंदोत्सवाचे आयोजन करण्यात आले.

**स्वच्छता व संवर्धन - इतिहासाची जपणूक**

या उपक्रमाअंतर्गत गडावरील बुरुज, महादेव मंदिर परिसर, तसेच पायवाटा याठिकाणी झाडेझुडपे हटवून स्वच्छता करण्यात आली. प्लास्टिक व इतर अनैसर्गिक कचरा गोळा करून परिसर स्वच्छ आणि पर्यावरणपूरक बनविण्यात आला.

दुर्ग अभ्यासक व स्वयंसेवकांनी गडाचा ऐतिहासिक, भौगोलिक आणि सांस्कृतिक अभ्यासही केला. या कार्यात विविध वयोगटातील उत्साही दुर्गप्रेमींनी सहभाग घेतला.

**उत्सव: गडमाथ्यावर अभिमानाने!**

या ऐतिहासिक क्षणाचा उत्सव साजरा करत 'माझा गड, माझा अभिमान', 'जय भवानी, जय शिवाजी' अशा घोषणांनी संपूर्ण गड दुमदुमून गेला. फडपथक, गडगडाट घोषणाबाजी व हर हर महादेवच्या जयघोषात आनंदोत्सव साजरा झाला.

# राज्यातील अनधिकृत कत्तलखान्यांवर कारवाईचे आदेश- मंत्री उदय सामंत

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
ठाणे ग्रामीण - प्रतिनिधी
विकी जाधव



**मुंबई :** मालेगाव सह राज्यातील सर्वच अनधिकृत कत्तलखान्यांवर कारवाईचे आदेश देण्यात येत असल्याची माहिती मंत्री उदय सामंत यांनी विधानपरिषदेत दिली. मालेगाव येथील अनधिकृत कत्तलखान्यांच्या संदर्भात विधानपरिषदेत सदस्य विक्रांत पाटील यांनी उपस्थित केलेल्या लक्षवेधी सूचनेला उत्तर देताना मंत्री सामंत बोलत होते.

मंत्री सामंत म्हणाले की, मालेगावमधील कुरेशी मोहल्ला ते सरदार चौक या भागात कत्तलखान्यांची स्थिती चिंताजनक आहे. अनधिकृतपणे चालणाऱ्या कत्तलखान्यांवर कारवाई करणे अपेक्षित असून, काही ठिकाणी कारवाई झाली आहे. यासंदर्भात पोलिस प्रशासनाला आणखी कडक सूचना दिल्या जातील आणि जेथे अवैध कत्तलखाने सुरूआहेत, तिथे तातडीने कारवाई करण्यात येईल.

सणांच्या दिवशी महानगरपालिका व नगरपालिकांच्या माध्यमातून काही ठिकाणी तात्पुरते कत्तलखाने उभारले जातात. अशा ठिकाणी वाळू-मातीचा वापर करून रक्तवाहन थांबवण्याची काळजी घेतली जाते, असेही मंत्री सामंत यांनी स्पष्ट केले.

मोसम नदीत रक्तमिश्रित पाणी सोडल्याचा पुरावा सदर झाल्यास संबंधित अधिकाऱ्यांनी सभागृहात चुकीची माहिती दिल्याबद्दल चौकशी करून कारवाई केली जाईल. मोसम नदीच्या संवर्धनासाठी राज्य सरकारने १० कोटी ५२ लाख रुपयांचा निधी मंजूर केला असून त्यातील ५ कोटी २६ लाख रुपये मालेगाव महानगरपालिकेला देण्यात आले आहेत, असेही मंत्री सामंत यांनी सांगितले.




## वाचकांना विनम्र सूचना

दै.चालु वार्ता वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजुकराची शहानिशा करुनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात, त्याची दै.चालु वार्ता वृत्तपत्र समूह कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पूर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.चालु वार्ता वृत्तपत्र समूहाचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाहीत. याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

# राशि भविष्य

**मेष :** तुमच्यातील मूल जागे होईल आणि तुम्ही एकदम खेळीमेळीच्या मूडमध्ये जाल. धनाची देवाण-घेवाण आज दिवसभर असेल आणि दिवस मावळण्याची वेळी तुम्ही बचत करण्यात यशस्वी असाल.

**वृषभ :** आज तुम्ही करमणुकीत रमाल. क्रीडा प्रकार आणि मैदानावरील स्पर्धेमध्ये सहभागी व्हाल. तुमच्या जवळ आज पैसा ही पर्याप्त असेल आणि या सोबतच मनात शांती असेल.

**मिथुन :** कुटुंबात वैद्यकीय खर्च निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. जीवनसाथीच्या आरोग्य संबंधित समस्यांमुळे तुमचे धन खर्च होऊ शकते परंतु, तुम्हाला या विषयी चिंता करण्याची आवश्यकता नाही कारण, धन यासाठीच साठवले जाते की, ते कठीण वेळेत आपल्या कामी येईल.

**कर्क :** इतरांवर टीका करण्यात तुमचा वेळ वाया घालवू नका, त्याने तुमच्या आरोग्यावर परिणाम होऊ शकतो. तुमच्या जीवनसाथी सोबत मिळून आज तुम्ही भविष्यासाठी काही आर्थिक योजना बनवू शकतात आणि अपेक्षा आहे की, ही योजना यशस्वी होईल.

**सिंह :** एखाद्या कपटी धूर्त परिस्थितीचा सामना करावा लागल्यामुळे उदास होऊ नका. जसे अन्नामध्ये मीठ असणे गरजेचे आहे, तसेच जीवनात सुखाची किंमत कळण्यासाठी थोडेसे दुख असावे लागते.

**कन्या :** वाहन चालविताना काळजी घ्या. तुमच्या जीवनसाथी सोबत मिळून आज तुम्ही भविष्यासाठी काही आर्थिक योजना बनवू शकतात आणि अपेक्षा आहे की, ही योजना यशस्वी होईल.

**तुळ :** तुमचे व्यक्तिमत्व आज एखाद्या अत्तरासारखे काम करील. संयुक्त प्रकल्पात आणि संशयास्पद आर्थिक योजनांमध्ये गुंतवणूक करू नका. तुमच्या पालकांसोबत तुमचा आनंद वाटा. एकटेपणा आणि उदासीनतेच्या भावनेमुळे दडपणाखाली असलेल्या पालकांना थोडे बरे वाटेल.

**वृश्चिक :** आणखी आशावादी राहण्यासाठी स्वत:ला प्रवृत्त करा. त्यामुळे तुमचा आत्मविश्वास आणि परिवर्तनशीलता, लवचिकता वाढेल, पण त्याच वेळी भीतीपोटी, चिंतेमुळे निर्माण होणाऱ्या द्वेषमूलक वैरभावाचा त्याग करा.

**धनु :** स्वत:बद्दल छान वाटावे अशा गोष्टी घडण्याचा एकदम अद्भुत दिवस. धन तुमच्यासाठी गरजेचे आहे परंतु, धनला घेऊन इतके गंभीर होऊ नका की, आपल्या नात्यालाच खराब कराल. तुमच्या जंगी पाटीत आज सर्वांना सामावून घ्या.

**मकर :** इतरांशी आनंदाचे क्षण वाटल्यामुळे तुमची प्रकृती ताजीतवानी होईल. परंतु, तुम्ही प्रकृतीकडे दुर्लक्ष केलेत तर मात्र तुम्ही परत आजारी पडाल. दुस-यांच्या शब्दावर विसंबून तुम्ही गुंतवणूक केलीत तर आज आर्थिक तोटा होण्याची शक्यता आहे.

**कुंभ :** तुमचे वैयक्तिक प्रश्न तुमचा मानसिक आनंद हिरावून घेतली परंतु, तुम्ही आवडीचे वाचन करण्यासारखे मानसिक उपाय कराल तर ताणतणावाशी सामना करू शकाल. दीर्घकाळ प्रलंबित असणारी थकबाकी आणि येणे अंतिमत: प्राप्त होईल.

**मीन :** अन्य लोकांच्या यशाबद्दल त्यांचे कौतुक करीत तुम्ही तो आनंद साजरा कराल. आज तुम्हाला चांगल्यापैकी पैसा मिळणार आहे - परंतु खर्चात वाढ झाल्याने बचत करणे दुरापास्त ठरेल.

## जाहिर सूचना

दिनांक : १६/०७/२०२५

नमस्कार,

दै चालु वार्ता कडून जाहीर करण्यात येथे की जर आमचा म्हणजेचं दै चालु वार्ताचा प्रतिनिधी आहे म्हणून कोणी दावा करत असेल तर त्याचं ID कार्ड पाहू शकता किंवा नियुक्ती लेटर सध्या जे आमचे पत्रकार आहेत त्याच्याकडे चालू कालावधीचे ID कार्ड किंवा नियुक्ती लेटर असतं तेंच आमचे पत्रकार आहेत. (कालावधी संपलेले ID किंवा नियुक्ती लेटर असेल आणि ते दै चालु वार्ताचा प्रतिनिधी असल्याचा दावा करत असतील तर ते खोटं आहे. तर आपण आमच्या कार्यालयात खालील नं वर संपर्ककरू शकता.) जर कालावधीच्या आतील त्यांच्याकडे ID किंवा नियुक्ती लेटर नसेल तर ते सध्या आमचे म्हणजे दै चालु वार्ताचे अधिकृत पत्रकार नाहीत. जरी त्यांच्या पेपरला बातम्या लागत असतील तरीही ते अधीकृत नाहीत (बातम्या पत्रकारच्या नावानी त्यांनी केलेल्या विनंती मुळे लावल्या जातात.)

**टीप :** दै चालु वार्ताच नियुक्ती लेटर किंवा ID ओरिजिनल आहे कसं कळणार. ओरिजिनल ID व नियुक्तीलेटर वर युन्कि रेफरन्स नं आहे जों Ref पासून सुरु होतो.

कार्यालय : जय चेम्बर, दुसरा मजला ऑफिस नं २०७, २०८ शिवाजी रोड स्वारगेट चौक पुणे, मो ९३७३५०४७४८

